cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-२२८ | मंगळवार दि.१६ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### माणासांतील देव सगळ्यांनीच जपावा !

पुण्यात पुन्हा एकदा रुग्णाच्या नातेवाईकांनी एका रुग्णालयात साहित्याची मोडतोड केली. डॉटरांनी दुर्लक्ष केल्याने रुग्णाचा मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा आरोप होता. फलटण रुग्णालयात देखील नुकताच असा प्रकार घडला. रुग्णालय खासगी असो अथवा सरकारी; अशा घटनांचे प्रमाण वाढत आहे. ही एक गंभीर समस्या बनली आहे.

# शासनाची समिती करणार ऑफलाईन पीक पाहणी

## शेतकऱ्यांना दिलासा; शासन निर्णय जारी

पुणे । प्रतिनिधी

**खरीप २०२५ मध्ये ई पीक पाहणी न झालेल्या शेतकऱ्यांची ऑफलाईन पद्धतीने सातबारावर नोंद करण्यासाठी राज्य सरकारने समिती गठीत करण्यासाठी शासन निर्णय प्रसिध्द केला आहे. राज्यात कापूस, सोयाबीन, मक्याची हमीभाव खरेदी सुरु आहे. परंतु विविध कारणाने खरीप हंगामात २१ टक्के शेतकऱ्यांची सातबारावर पिकांची नोंद झाली नाही. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १५ जानेवारीपर्यंत ऑफलाईन ई पीक पाहणी करण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा केली. त्यानंतर राज्य सरकारने याबाबत शासन निर्णय जारी केला आहे.**

उप विभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत सदस्य म्हणून तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. ज्या शेतकऱ्यांनी काही कारणांमुळे पिकांची नोंद केली नाही,



त्यामुळे सातबारा उताऱ्यावर नोंद झाली नाही. त्याबाबत या समितीमधील सदस्यांना प्रत्यक्षात पीक असल्याची फेरचौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. समितीच्या सदस्यांनी १५ जानेवारी २०२६ पर्यंत फेरचौकशीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करावेत, अशा सूचना दिल्या आहेत. तर जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत दररोज आढावा घेऊन अहवाल महसूल आणि पणन विभागाला सादर करावा.

▶▶ पान २ वर

# पीएम किसान योजनेच्या पैशात कोणतीही वाढ नाही!

## संसदेत सरकारने दिली माहिती

नवी दिल्ली । वृतसंस्था

**पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना प्रत्येकी २ हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांमधून वर्षाला ६ हजार आर्थिक मदत दिली जाते. डिसेंबर २०२४ मध्ये संसदीय स्थायी समितीने ही रक्कम वाढवून १२ हजार रुपये करण्याचा प्रस्ताव मांडला होता. मात्र तसे सरकारच्या विचाराधीन नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.**

पीएम किसान योजनेची रक्कम दुपटीने वाढविण्याची ही शिफारस सरकारने स्वीकारली आहे का? या प्रश्नावर राज्यसभेत सरकारने उत्तर दिले आहे. याबाबत राज्यसभेतील तृणमूलचे खासदार समीरुल इस्लाम यांनी प्रश्न उपस्थित



केला. याला उत्तर देताना, कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी, याबाबत असा कोणताही प्रस्ताव तूर्त विचाराधीन नसल्याचे म्हटले आहे. पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्राची नोंदणी बंधनकारक आहे का? असाही प्रश्न इस्लाम यांनी उपस्थित केला. त्यावर मंत्री ठाकूर यांनी सांगितले की, ज्या १४ राज्यांत शेतकरी नोंदणीचे काम सुरू आहे; तिथे पीएम किसान

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तेजस्वी घोसाळकर यांचा भाजपमध्ये प्रवेश

मुंबईः मुंबई महापालिका निवडणुकीपूर्वी ठाकरे गट शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. तेजस्वी घोसाळकर यांनी ठाकरे गट शिवसेना पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. महापालिका निवडणुकीपूर्वी मुंबईतील ही मोठी घडामोड आहे. घोसाळकर कुटुंब हे ठाकरे कुटुंबाशी निष्ठावंत मानले जाते. मनीषा चौधरीसह विधानसभेच्या आमदार आहेत. पण त्यांच्याआधी शिवसेना नेते विनोद घोसाळकर दहिसर विधानसभेचे आमदार होते. तेजस्वी घोसाळकर या त्यांच्या सूनबाई आहेत. तेजस्वी घोसाळकर यांचे पती अभिषेक घोसाळकर यांचे एका दुर्दैवी घटनेत निधन झाले होते.

### शफाली वर्माल सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू पुरस्कार जाहीर

मुंबईः आयसीसीकडून प्रत्येक महिन्यातील सर्वोत्तम महिला आणि पुरुष क्रिकेटपटूला प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कार देण्यात येतो. त्यानुसार नोव्हेंबर २०२५ महिन्यातील सर्वोत्तम खेळाडूंच्या पुरस्काराची घोषणा सोमवारी करण्यात आली. भारताच्या शफाली वर्माला हा प्लेअर ऑफ द मंथ पुरस्कार देण्यात आला. भारताची युवा फलंदाज शफाली वर्माने नोव्हेंबरमध्ये महिला वनडे वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेतील अंतिम सामना खेळला होता. या सामन्यातील तिच्या अफलातून कामगिरीसाठी तिला हा नोव्हेंबर २०२५ महिन्यातील सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू पुरस्कार मिळाला आहे. विशेष म्हणजे शफाली वर्माला वर्ल्डकपसाठी संघात स्थान देण्यात आले नव्हते. पण सेमीफायनलपूर्वी प्रतिका रावलला दुखापत झाल्याने तिच्या जागेवर शफालीला संधी देण्यात आली होती.

### राम मंदिर आंदोलनातील नेते डॉ.वेदांती यांचे निधन

अयोध्याः राम मंदिर आंदोलनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे आणि दोनवेळा खासदार राहिलेले डॉ. रामविलास दास वेदांती यांचे सेमवारी (दि. १५) निधन झाले. मध्य प्रदेशातील रीवा येथे एका कथा महोत्सवावेळी अचानक त्यांची तब्येत बिघडली. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांची प्राणज्योत मालवली. ७७ वर्षीय वेदांती यांचे मंदिर आंदोलनात मोठे योगदान होते. ते ९० च्या दशकात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे गुरू अवैद्यनाथ स्वामी आणि परमहंस यांच्यासह मंदिर आंदोलनाच्या अग्रभागी असलेल्या नेत्यांपैकी एक होते. ते १९९६ आणि १९९८ मध्ये दोन वेळा खासदार म्हणून निवडून आले होते. दरम्यान, त्यांच्यावर मंगळवारी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

### नितीन नबीन यांनी भाजपाचे सूत्रे स्वीकारली

दिल्लीः भारतीय जनता पार्टी पक्षाने बिहार सरकारमधील कॅबिनेट मंत्री नितीन नबीन यांची राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. भाजपने घेतलेल्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे. नबीन हे भविष्यात जे.पी. नड्डा यांच्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सांभाळण्याची दाट शक्यता आहे. नवनियुक्त राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष नितीन नबीन यांनी सोमवारी (१५ डिसेंबर) पक्षाच्या दिल्लीतील मुख्यालयात औपचारिकपणे आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा आणि पक्षाचे अन्य ज्येष्ठ नेते उपस्थित होते. पदभार स्वीकारण्यासाठी नबीन सोमवारी सायंकाळी बिहारहून दिल्लीतील पक्ष कार्यालयात दाखल झाले आणि तिथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.

# राज्यातील महापालिका निवडणुकिचे बिगुल वाजले

## १५ जानेवारीला मतदान तर १६ जानेवारीला निकाल

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य निवडणूक आयोगाची सोमवारी (दि. १५ डिसेंबर) बहूप्रतिक्षित पत्रकार परिषद सह्याद्री अतिथी गृह इथे झाली. अनेक वर्षांपासून महानगरपालिका निवडणुकीची तयारी करणाऱ्या इच्छुक उमेदवारांचा अखेर जीव भांड्यात पडला आहे. राज्यातील सर्व २९ महापालिका निवडणुका या १५ जानेवारी २०२६ तारखेला होणार असून, या निवडणुकांचे निकाल हे १६ जानेवारीला लागणार आहेत. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी ही घोषणा केली.**

राज्यातील २८६९ जागांसाठी निवडणूक होणार आहे. १४४२ जागा या महिलांसाठी राखीव असणार आहेत. घोषणा झाल्यापासून २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी आचार संहिता लागू करण्यात आली आहे. राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुका प्रलंबित होत्या. २७ नगर पालिकांची मुदत संपली होती. जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन नगरपालिका अस्तित्वात आल्या आहेत. २८ बहूसदस्यीय तर बृहमुंबई



महापालिका ही एक सदस्यीय निवडणूक असणार आहे. निवडणूक ही इव्हीएम मशीनवरच घेण्यात येणार आहे. तर अर्ज स्विकारणे २३ ते ३० डिसेंबर २०२५ पर्यंत असणार असून, अर्ज छाननी ३१ डिसेंबर रोजी होणार आहे. उमेदवार माघारीची मुदत २ जानेवारी असून, अंतिम उमेदवारांची यादी ३ जानेवारीला लागणार आहे. यासाठी मतदान दिनांक १५ जानेवारी तर मतमोजणी १६ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. राज्यात नुकत्याच नगर परिषद आणि नगर पालिकांच्या निवडणुका

▶▶ पान २ वर

# खासगी क्लासमध्ये लेक्चर सुरू असतानाच विद्यार्थ्याचा निर्घृण खून

राजगुरुनगर । प्रतिनिधी

शहरात सोमवारी सकाळी घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. कोर्ट रस्त्यानजिक असलेल्या संस्कार कोचिंग क्लासेस या खासगी कोचिंग क्लासमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचे लेक्चर सुरू असतानाच, त्याच वर्गातील एका विद्यार्थ्याने आपल्या मित्राचा धारदार हत्याराने गळा चिरून त्याचा निर्घृण खून केल्याची खळबळजनक घटना घडली.

समोर आलेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास दहावीचे नियमित लेक्चर सुरू होते. लेक्चर सुटण्याच्या वेळेत शेजारी बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अचानक वाद उफाळून आला. त्याच वेळी शेजारी बसलेल्या मित्राने पुष्कर दिलीप शिंगाडे (वय अंदाजे १६) याच्यावर धारदार हत्याराने गळा चिरून तसेच पोटात व डोक्यात वार केले. हा संपूर्ण प्रकार विद्यार्थ्यांच्या समोरच घडल्याने वर्गात एकच गोंधळ उडाला. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या पुष्करला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर कोचिंग

▶▶ पान २ वर

# शिंदेंसोबत जास्तीत जास्त ठिकाणी युती, पुण्यात अजितदादांविरोधात लढू

## निवडणुका जाहीर होताच मुख्यमंत्री यांनी सांगितली रणनिती

मुंबई । प्रतिनिधी

**राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. यानंतर आता राजकीय हालचाली वेगाने सुरु झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना, या निवडणुकीत जनता महायुतीला कौल देईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. त्यांनी युतीबाबतची भूमिकाही**



**स्पष्ट केली आहे.**

जास्तीत जास्त ठिकाणी भाजप - शिंदेंच्या शिवसेनेची युती असेल. काही ठिकाणी भाजप-शिवसेना- राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र लढतील. ठाणे, कल्याणमध्ये महायुती एकत्र लढेल. पण पुणे, पिंपरीत भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी एकत्रित लढणार नाही. आम्ही येथे एकमेकांच्या समोर लढू, पण ही मैत्रीपूर्ण लढत असेल, फडणवीस यांनी स्पष्ट केले. फडणवीस पुढे म्हणाले, पुण्यात अजितदादांशी चर्चा झाली. भाजपने पाच वर्षे पुण्याचा चांगला विकास केला. कदाचित पुण्यामध्ये भाजप-राष्ट्रवादी

▶▶ पान २ वर

# मतचोरी हा काँग्रेसचा मुद्दा, आघाडीचा नाही-अब्दुल्ला

श्रीनगर । वृतसंस्था

काँग्रेस पक्षाने रविवारी (दि. १४ डिसेंबर) दिल्लीतील रामलीला मैदानावर 'वोट चोर गद्दी छोड' आंदोलन केले. यावेळी झालेल्या सभेत काँग्रेस नेत्यांनी भाजप आणि निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली. मात्र, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी काँग्रेसच्या या आरोपांपासून स्वतःला स्पष्टपणे वेगळे ठेवले आहे. या मुद्द्याचा आघाडीशी काहीही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. उमर अब्दुल्ला यांचा नॅशनल कॉन्फरन्स पक्ष हा विरोधी आघाडीचा घटक असून, लोकसभेतील खासदारांच्या संख्येनुसार काँग्रेस हा या आघाडीतील सर्वात मोठा पक्ष आहे. उमर अब्दुल्ला म्हणाले, आघाडीचा याच्याशी काहीही संबंध नाही.

▶▶ पान २ वर

# डॉक्टर गौरी गर्जे प्रकरणात पती अनंत गर्जेला पुन्हा अटक

मुंबई । प्रतिनिधी

**भाजपच्या आमदार आणि मंत्री पंकजा मुंडे यांचे स्वीय सहायक अनंत गर्जे यांना गौरी गर्जे मृत्यू प्रकरणात राज्याच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) पुन्हा अटक केली आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात आणि तपास प्रक्रियेत मोठी खळबळ उडाली आहे.**



काही दिवसांपूर्वी अनंत गर्जे यांच्या पत्नी गौरी गर्जे यांनी त्यांच्या वरळी येथील निवासस्थानी गळफास लावून आत्महत्या केली होती. एका राजकीय व्यक्तीशी संबंध असलेल्या व्यक्तीच्या उच्चशिक्षित पत्नीने टोकाचे पाऊल उचलल्याने हे प्रकरण चर्चेत आले होते. गौरी गर्जे यांच्या आत्महत्येनंतर वरळी पोलिसांनी त्यांचे पती अनंत गर्जे यांना तात्काळ अटक केली होती. मात्र, गौरीच्या कुटुंबीयांनी ही आत्महत्या

▶▶ पान २ वर

# मनरेगाच्या योजनेतील महात्मा गांधीचे नाव बदलणार

## केंद्र सरकार नवा रोजगार कायदा आणणार

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्र सरकार महात्मा गांधी ग्रामीण रोजगार गॅरंटी अधिनियम अर्थात मनरेगा रद्द करून नवीन कायदा आणण्याच्या तयारीत आहे. मनरेगा रद्द करून त्याच्या जागी विकसीत भारत गॅरंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन वीबी जी राम जी कायदा करण्यासाठी संसदेत एक विधेयक सादर केले जाण्याची शक्यात आहे.

जुन्या कायद्याअंतर्गत ग्रामीण भागातील कुटुंबाला १०० दिवसाच्या वेतन रोजगाराची



कायदेशीर हमी मिळत होती. नवीन कायद्यामध्ये राज्य सरकारांवरील खर्चाचा भार वाढणार आहे. तसेच सध्याच्या १०० दिवसांच्या रोजगार हमीची संख्या वाढवून


▶▶ पान २ वर

# विद्यार्थ्यांना मारल्यास होणार शिक्षा

## शासनाची शिक्षक, मुख्याध्यापकांसाठी नियमावली

मुंबई : प्रतिनिधी

**राज्य सरकारने राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कठोर निर्देश जारी केले आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार शारीरिक शिक्षा, मानसिक छळ आणि कोणत्याही प्रकारच्या भेदभावास पूर्णत: बंदी घालण्यात आली असून, बालस्नेही वातावरण राखण्यासाठी नवीन नियमांची अंमलबजावणी करणे सर्व शाळांना बंधनकारक आहे.**



### कठोर शिस्तभंगाची कारवाई

जर या नियमांचे उल्लंघन झाल्यास कठोर शिक्षा करण्यात येणार आहे. तसेच कोणतीही चुकीची घटना घडल्यास तिची नोंद करायची आणि कॅमेरा फुटेजसह सगळे पुरावे जपून ठेवावे.जर कोणी घटना दाबण्याचा प्रयत्न केला किंवा खोटी माहिती दिली, तर त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई होईल. हा आदेश महाराष्ट्रातील सरकारी, अनुदानित आणि खासगी अशा सर्व प्रकारच्या शाळांना पाळणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र सरकारने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांना शाळेत आनंदी वाटेल असे वातावरण तयार करण्यासाठी एक खूप महत्त्वाचा शासन निर्णय जारी केला आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि शिक्षण संस्थांमध्ये सुरक्षित वातावरण सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे आता शाळेतील शिक्षक आणि कर्मचा-यांसाठी

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू:४७.५० क्विंटल | | |
| २,३५१ | ३,०७५ | २,६९६ |
| ज्वारी/हायब्रिड: ६२.०० क्विंटल | | |
| २,२८० | ३,३२० | २,७२१ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | | |
| १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.०० क्विंटल | | |
| ६,२०० | ६,२०० | ६,२०० |
| उडीद :१२.५० क्विंटल | | |
| ५,७०० | ५,८७२ | ५,७८७ |
| बाजरी: ७६.०० क्विंटल | | |
| २,५०० | ३,४५१ | २,८६८ |
| मुग: ०.५० क्विंटल | | |
| ७,५०१ | ७,५०१ | ७,५०१ |
| सोयाबीन: २३.०० क्विंटल | | |
| ४,४११ | ४,४५० | ४,४३० |
| हरभरा: १७.५० क्विंटल | | |
| ४,६०० | ५,२०० | ४,९०० |

cmyk

## अग्रलेख

# माणासांतील देव सगळ्यांनीच जपावा !

पुण्यात पुन्हा एकदा रुग्णाच्या नातेवाईकांनी एका रुग्णालयात साहित्याची मोडतोड केली. डॉटरांनी दुर्लक्ष केल्याने रुग्णाचा मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा आरोप होता. फलटण रुग्णालयात देखील नुकताच असा प्रकार घडला. रुग्णालय खासगी असो अथवा सरकारी; अशा घटनांचे प्रमाण वाढत आहे. ही एक गंभीर समस्या बनली आहे. पुण्यातील घटनेत एका पक्षाचे राजकीय पदाधिकारी सामील असल्याचे प्रसिद्ध झालेल्या बातम्यांतून स्पष्ट होते. त्यांच्यासह इतर काही जणांवर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. राजकीय नेते आणि पदाधिकाऱ्यांना कार्यकर्ते त्यांचे आदर्श मानतात. राजकीय पार्श्वभूमी असलेले लोकच डॉटरांवर हल्ले करायला लागले तर त्यांचे कार्यकर्ते त्यांचीच 'री'ओढणार! कारण ते नेत्यांच्या पावलावर पाऊल ठेऊनच चालतात. परिणामी अशा प्रवृत्तीचे प्रतिबिंब सरकारी रुग्णालयात उमटते.

झालेल्या घटनेत दोष कोणाचा? हा शोधनाचा भाग ठरतो. जसे, पुण्यातील घटनेचा अहवाल वैद्यकीय मंडळाकडे पाठवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. तथापि घटनेची कारणमीमांसा करण्याची गरजही नातेवाईकांना का वाटू नये? डॉटरांवर हल्ला का करावासा वाटला, यावर नि:ष्पक्ष आणि पारदर्शकपणे चर्चा व्हायला हवी. त्यातून कदाचित अनेक गोष्टींवर प्रकाश पडू शकेल. कारणे सापडू शकतील. कारण अशा घटनांचे सरकारी वैद्यकीय क्षेत्रावर दीर्घकालीन परिमाण संभवतात. मुळात शासनाकडे डॉटरांची संख्या पुरेशी नाही. अनेक पदे रिक्त आढळतात. डॉटरांच्या भरतीची जाहिरात सरकार अधूनमधून प्रसिद्ध करते, पण त्याला प्रतिसाद मिळत नसल्याचे सांगितले जाते. अनेकदा निवड झालेले डॉटर दिलेल्या मुदतीत हजर होत नाहीत. एरवी सरकारी नोकरीवर बेरोजगारांच्या उड्या पडतात. बोटांवर मोजण्याइतक्या जागांसाठी लाखो अर्ज दखल होतात. अगदी चतुर्थ श्रेणीच्या पदांसाठी उच्च विद्याविभूषित व्यक्तीही अर्ज करतात. मग डॉक्टर भरतीच्या जाहिरातीला प्रतिसाद का मिळत नाही? सरकार दरबारी याचा विचार होतच नसेल का? त्यामागची कारणे शोधली जात नाहीत का? खासगी आणि सरकारी सेवेतील वेतनातील प्रचंड तफावत असते. त्या तुलनेत रुग्णांची प्रचंड गर्दी, पायाभूत सुविधांमधील उणिवा, ही त्याची दृश्य कारणे सामान्यतः सांगितली जातात. याशिवाय राजकीय दबाव हेही त्याचे एक अदृश्य कारण सांगितले जाते. डॉटरांच्या खासगी गप्पांमध्ये त्याविषयी चर्चा होते. सरकारी डॉक्टर आणि संबंधित सेवकांवर राजकीय दबाव नसतो, असे कोणता सरकारी अधिकारी ठामपणे सांगू शकेल? सत्ताधारी तरी ते नाकारतील का? अनेक प्रकरणे त्यामुळेही गाजतात.

देशातील १० टक्के डॉक्टर तणावात असल्याचा निष्कर्ष 'आयएमए'च्या गोवा विभागाने नोंदवला होता. या सर्व बाबी सरकार आणि सत्ताधारीही जाणून असतील. अनेक डॉक्टर माध्यमांत लेखन करतात. त्यांच्या लेखनात याला स्पर्श केलेला असतो. डॉक्टर आणि रुग्णाचे नातेवाईक यापैकी नेमका दोषी कोण? हे शोधणे आणि दोषींवर कारवाई करणे हे यंत्रणेचे काम आहे. यंत्रणा ते पारदर्शक पद्धतीने पार पाडते का हाही कळीचा मुद्दा आहे. कारणे कोणती आणि कितीही असली तरी अशा घटना वाढू नयेत यासाठी सरकारला काम करावे लागेल. कारण सरकारी सेवेवर लोकसंख्येचा फार मोठा हिस्सा अवलंबून आहे. वैद्यकीय उपचार दिवसेंदिवस महागडे होत आहेत.

सरकारी सेवेतील उणिवांवर माध्यमे वरचेवर प्रकाश टाकतात. तरीसुद्धा सामान्य माणसांना सरकारी आरोग्यसेवेचाच आधार घ्यावा लागतो. सर्दी, खोकला, ताप, थंडी अशा किरकोळ आजारांवरील उपचारासाठी लोकांना सरकारी रुग्णालयात धाव घ्यावी लागते. अशा वादांचे परिणाम निष्पाप रुग्णांना सहन करावे लागतात. डॉक्टर आणि रुग्ण हे या सेवेचे दोन मुख्य खांब आहेत. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यात संवादाचा वाढता अभाव हेही अशा वाढत्या विसंवादाचे एक कारण आहे. डॉक्टर आणि रुग्ण हे दोन घटक या सेवेचा मुख्य आधार मानले जातात. दोन्हींचे अस्तित्व एकमेकांना पूरक आहे. आरोग्य व्यवस्था आणि दोन्ही घटकांच्या आरोग्यासाठी त्यांचे परस्पर संबंध विश्वासाचे असण्याला दुसरा कोणताही पर्याय नाही. ते धोक्यात येण्याचे कारण ठरणाऱ्या प्रवृत्तींना सरकार कसे आळा घालणार, यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत.

# प्रभारी प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.कुंवर यांनी पदभार स्वीकारला




## प्रलंबित कामे पूर्ण करण्याचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या योजना शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांच्याकडे प्राथमिक शिक्षण विभागाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५ रोजी सदर आदेश निर्गमित केले आहेत. प्रभारी प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा डॉ. किरण कुंवर यांनी सोमवारी कार्यभार स्वीकारला.**

दरम्यान शिक्षणाधिकारी डॉ. कुंवर यांनी कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन परिचय आणि कामाची माहिती घेतली. अधिकारी, कर्मचारी यांच्या बैठकीत बोलतांना, ' सर्वांनी प्रलंबित असलेली आपली कामे जबाबदारीने तात्काळ पूर्ण करावीत. डिसेंबर अखेरपर्यंत कामे पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या'. यावेळी उपशिक्षणाधिकारी जाधव, श्रीमती सय्यद अंजुम, लेखाधिकारी बाळासाहेब वीर, कोल्हापुरे, अधीक्षक रंगनाथ राऊत, शिक्षण विस्तार अधिकारी भगवान सोनवणे, समन्वयक राहुल चाटे, सहाय्यक प्रशासन अधिकारी अनंत खेडकर, शिवाजी अदमुडवाड, कनिष्ठ प्रशासन अधिकारी जोशी, प्रताप जाधव, यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# ना दुरूस्त लालपरी ९० प्रवाशाचे जीव मेटाकुटीला

**जालना । प्रतिनिधी**

बसचा प्रवास सुखाचा प्रवास असे फक्त बोलले जाते असे म्हणायला हरकत यालाच म्हणतात नाव मोठे लक्षण खोटे. धोकादायक घटना अंबड बस स्थानक मध्ये घडली अंबड डेपोची बस क्रमांक एम एच २६०९ अक्कलकोट जालना सदरील बस१५ डिसेंबर रोजी ४.४५ या वेळेमध्ये अंबड बस स्थानक मध्ये आले असता सदरील बस मध्ये ९० प्रवासी झाल्यामुळे सदर बस अंबड स्थानकावरून निघाली असता टेकडा असल्यामुळे व खराब बस असल्यामुळे लोड घेत



नसल्याने बस परत मागे आली यामुळे प्रवासांचा जीव वाचला लांब रूट साठी नवीन गाड्या देणे गरजेचे असते परंतु काही बस संघटनेच्या राजकारण मुळे वाहक चालक यांना जाणून-बोजून खराब गाड्या दिल्या जातात यावरून दिसून येत आहे.सदरील बस मधून प्रवासी कमी केल्यानंतर सदरील बस अंबड स्थानक मधून अर्धा तासानंतर अंबड बस स्थानक मधून बाहेर निघाली. अंबड बस स्थानक मध्ये कोण अधिकारी कोण कर्मचारी कोणाचा कोणाला ताळमेळ नसल्यामुळे हा प्रकार घडले असल्याचे बोलल्या जात आहे. बस मध्ये प्रवासी जास्त असल्यामुळे बस लोड घेत नसल्यामुळे बस चालक यांनी बस स्थानकामध्येच उभा करावी लागली. या सर्व प्रकरणी विभागी नियंत्रक अधिकारी श्रीमती सपकाळ यांनी याप्रकरणी सुधारणा करण्यासंदर्भात प्रवासाकडून मागणी करण्यात येत आहे.




## नागपूर हिवाळी अधिवेशन विधानसभाकामकाज महत्वाच्या विषयांवर लक्ष वेधी

**मुंबई । प्रतिनिधी**

**गोवंश संवर्धन आणि भाकड जनावरांच्या पालनाबाबत शासनाची भूमिका अत्यंत संवेदनशील आहे. गोवंश वाचवायचा असेल तर भाकड जनावरांचे संगोपन महत्त्वाचे आहे. त्यामुळे गोरक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर अनुदान देणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असून, या बाबतीत राज्य देशात पहिल्या क्रमांकावर असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.**

शेतकरी स्वतः जनावरांची वाहतूक करत असताना त्यांची अडवणूक झाली, तर अशा प्रकरणात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील. गोशाळांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाबाबत नियमित लेखापरीक्षण (ऑडिट) केले जाईल. भविष्यात बायोमेट्रिक प्रणालीद्वारे जनावरांची नोंदणी करण्याबाबतही विचार सुरू असल्याचे पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# बीड येथे शनि जन्मोत्सवानिमित्त कीर्तन महोत्सव व शिवमहापुराण कथा

**बीड । प्रतिनिधी**

**श्री क्षेत्र शनि मंदिर संस्थान ट्रस्ट, बीड यांच्या वतीने शनि महाराजांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून रविवार दिनांक २१ डिसेंबर २०२५ ते रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत भव्य कीर्तन महोत्सव व शिवमहापुराण कथा आयोजित करण्यात आली आहे.**

या शनि जन्मो महोत्सवात दररोज सकाळी व सायंकाळी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, पहाटे काकडा, विष्णु सहस्रनाम, १० ते १२ गाथा भजन, शिवमहापुराण कथा दुपारी १ ते ५ तसेच रात्री ७.३० हरिकीर्तन व नंतर हरिजागर होणार आहे. या कीर्तन महोत्सवात नामवंत कीर्तनकार सहभागी होत असून, रविवारी शिवमहात्म्य, सोमवारी शिवलिंग निर्मिती व शिवपार्वती विवाह महिमा, मंगळवारी बिल्व महिमा, भस्म महिमा, कर्पूर महिमा, बुधवारी नंदी चरित्र, कुबेर चरित्र, स्थूलाची कथा, गुरुवारी सती चरित्र, भक्ती चरित्र, शिवपार्वती विवाह, शुक्रवारी शिवपुत्र चरित्र, तुलसी चरित्र व विविध अद्भुत कथा तर शनिवारी १२



ज्योतिर्लिंग कथा, शिवावतार कथा, पाशुपत व्रत महिमा व शिवपुराण महात्म्य यांचे श्रवण भक्तांना मिळणार आहे. या सप्ताहात ह.भ.प. महंत नवनाथ महाराज जाधव, ह.भ.प. कृष्णा महाराज घाडे, ह.भ.प. नागा महाराज कदम, ह.भ.प. गणेश्वर महाराज दराडे, ह.भ.प. महंत स्वामी योगीराज महाराज, ह.भ.प. शिवाजी महाराज मते, ह.भ.प. गणेश महाराज वांगरे आदी मान्यवर कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. शिवमहापुराण कथेचे प्रवचन ह.भ.प. तोफिन महाराज सरफळ (भागवताचार्य, बीड) हे करणार असून, संगीत सेवा ह.भ.प. माऊली महाराज तुमरे, ह.भ.प. कृष्णाई सरफळ, ह.भ.प. गणपत महाराज सरफळ व ह.भ.प. जनार्दन महाराज कराळे हे देणार आहेत. शनि जन्मो उत्सव कार्यक्रम दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ दरम्यान रुद्र तेला अभिषेक होणार असून, जन्मोत्सव सोहळा सायंकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे. या महोत्सवाची सांगता रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते १२ दरम्यान ह.भ.प. प.पू. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे १२ वाजता शनि महाराज आरती आणि नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र शनि जन्मोत्सव व कीर्तन महोत्सवाचा लाभ बीड जिल्ह्यातील व परिसरातील सर्व शनीभक्तांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन श्री शनि मंदिर देवस्थान ट्रस्ट समिती, सर्व विश्वस्त व शनीभक्त, शनि मंदिर गल्ली, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## प्रतास सरनाईकांच्या कारभाराची वर्षपुर्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

**१५ डिसेंबर २०२५ मुंबई मंत्रालय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आजच्या दिवशी गेल्या २०२४ या वर्षात मी परिवहन मंत्रीपदाची शपथ घेतली आणि जनतेचा सेवेकरी म्हणून परिवहन विभागाची जबाबदारी स्वीकारली. आज त्या क्षणाला एक वर्ष पूर्ण झाले आहे.**

या एका वर्षाच्या कालावधीत मंत्रालयातील अधिकारी, कर्मचारी व सर्व सहकाऱ्यांची मला मोलाची साथ लाभली. परिवहन मंत्री म्हणून जनहितासाठी घेतलेल्या प्रत्येक निर्णयात त्यांच्या अनुभवपूर्ण मार्गदर्शनाचा आणि सहकार्याचा मोठा वाटा राहिला आहे. या सर्व सहकाऱ्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून पुढील काळातही परिवहन विभागाची कामगिरी अधिक सक्षम, पारदर्शक आणि परिणामकारक राहील, असा मला पूर्ण विश्वास आहे. जनतेच्या हितासाठी कटिबद्ध राहून सेवा देण्याचा हा प्रवास पुढेही अखंडपणे सुरू राहील.

## पान १ वरून...

### पीएम किसान योजनेच्या

योजनेअंतर्गत नवीन नोंदणी करण्यासाठी शेतकरी ओळखपत्र बंधनकारक केले आहे. ज्या राज्यांमध्ये अद्याप शेतकरी नोंदणीचे काम सुरू झालेले नाही, तेथील शेतकरी फार्मर आयडीविना नोंदणी करू शकतात, असे ठाकूर यांनी स्पष्ट केले. पीएम किसान योजनेची सुरुवात फेब्रुवारी २०१९ मध्ये झाली. शेतकऱ्यांना शेतीकामासाठी आर्थिक मदत देण्याचा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत थेट लाभ हस्तांतरण माध्यमातून शेतकऱ्यांच्या आधारशी जोडलेल्या बँक खात्यांमध्ये तीन समान हप्त्यांमध्ये दरवर्षी ६ हजार रुपये जमा केले जातात. या योजनेच्या सुरुवातीपासून आतापर्यंत २१ हप्त्यांतून सुमारे ४.०९ लाख कोटी रक्कम हस्तांतरित करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतीयोग्य जमीन हा मुख्य पात्रता निकष आहे.

----------------

### शासनाची समिती करणार

या अहवालानुसार पणन विभागाने पिक खरेदी करावी. तसेच समितीच्या फेरचौकशीमध्ये होणाऱ्या पीक नोंदीनुसारच शेतातील शेतमाल खरेदी केंद्रावर खरेदी करण्यासाठी आवश्यक सूचना निर्गमित करण्याचे निर्देश शासन निर्णयात देण्यात आले आहेत. दरम्यान, शेतकऱ्यांनी स्वत: मोबाईलवरून ई पीक पाहणी केली असणे, हमीभाव खरेदीसाठी बंधनकारक आहे. परंतु शेतातील नेटवर्कच्या अडचणी, जीपीएसचा गोंधळ आणि अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे शेतकऱ्यांना ई पीक पाहणीत अडथळ्याचा सामना करावा लागला. परिणामी ७९ टक्के शेतकऱ्यांना ई पीक पाहणी करता आली. परंतु २१ टक्के शेतकरी ई पीक पाहणी करू शकले नाहीत. यावरून नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात विधानसभेत आमदारांनी प्रश्न उपस्थित केला.

-----------------

### राज्यातील महापालिका

पार पडल्या. यासाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले, मात्र आरक्षण मर्यादा आलोंडल्यामुळे काही नगरपालिका अन् नगर परिषदांचे मतदान २१ डिसेंबर रोजी घेण्यात येणार आहे तर याचा निकाल देखील २२ डिसेंबर रोजी जाहीर करण्यात येणार आहे. नगरपरिषद निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतरच महानगर पालिका निवडणुका कधी लागणार याची उत्सुकता सर्वांना लागली होती.

-------------

### शिंदेंसोबत जास्तीत जास्त ठिकाणी

काँग्रेस आमने- सामने लढताना पाहायला मिळतील. ही मैत्रीपूर्ण लढत असेल, पण कुठेही कटूता नसेल. पिंपरी-चिंचवडमध्ये अजितदादा आणि आम्ही एकत्रित लढणार नाही. एकत्रित लढलो तर तिसऱ्याचा फायदा होईल. तर शिवसेना शक्य तिथे आमच्यासोबत असेल. नगरपंचायत आणि नगरपालिका निवडणुकीदरम्यान एकमेकांचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना पक्ष प्रवेश देण्यावरुन भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत वाद निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी, शिंदे आणि आमचे ठरलेय, एकमेकांचे घ्यायचे नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, दोन्ही ठाकरे एकत्रित आले तर मुंबईत तुम्हाला फटका बसेल का? या प्रश्नावर बोलताना फडणवीस म्हणाले की, आम्हाला कुठलाही फटका बसणार नाही. ठाकरे आणि त्यांच्यासोबत काँग्रेस असे जरी एकत्रित आले तरी मुंबईकर भाजप-शिवसेनेला निवडून देतील. मतदारयाद्यांमध्ये घोळ आहे हे आम्ही देखील दाखवून दिले असल्याचे त्यांनी म्हटले.

--------------

### खासगी क्लासमध्ये लेक्चर सुरू

क्लासमधील विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, मृत पुष्कर शिंगाडे आणि हल्लेखोर विद्यार्थी हे दोघेही एकाच वर्गातील मित्र होते. सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्या वादातूनच मनात राग धरून हा खून केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनेनंतर हल्लेखोर विद्यार्थी स्वतःहून खेड पोलिस ठाण्यात हजर झाल्याचेही पोलिसांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच खेड पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. कोचिंग क्लासमधील सीसीटीव्ही फुटेज, विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे जबाब, तसेच वापरलेल्या हत्याराची तपासणी सुरू आहे. अल्पवयीन आरोपी असल्याने प्रकरणाबाबत बाल न्याय अधिनियमानुसार पुढील कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

-----------

### मनरेगाच्या योजनेतील महात्मा गांधीचे

१२५ दिवस करण्यात येणार आहे. सरकारने सोमवारी लोकसभा सदस्यांमध्ये या विधेयकाच्या कॉपी वाटल्या. या विधेयकाचा उद्देश हा २०४७ मध्ये विकसीत भारताच्या राष्ट्रीय व्हिजनसोबत समतोल साधत ग्रामीण विकासाचे स्ट्रक्चर निर्माण करणे हा आहे. विधेयकाच्या कॉपीमध्ये दिल्यानुसार या विधेयकाचा उद्देश हा संसदेत विकसित भारत-गारंटी फॉर रोज़गार ॲन्ड आजीविका मिशन - २०२५ हे विधेयक सादर करणे आणि २००५ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम रद्द करणे हा आहे. नवीन विधेयकाचा उद्देश हा एक समृद्ध आणि फ्लेक्सीबल ग्रामीण भारतासाठी सक्षमीकरण, विकास आणि वृद्धीला चालना देणे हा आहे. हा नवा कायदा ग्रामीण विकासाचे स्ट्रक्चरला विकसित भारत २०२४ च्या राष्ट्रीय दृष्टीकोणातून तयार करण्यासाठीचे एक मोठे पाऊल ठरण्याची शक्यता आहे. या विधेयकाची एक प्रत लोकसभा सदस्यांना देण्यात आली आहे. हे विधेयक संसदेत सादर केले जाणार आहे. याद्वारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रीण रोजगार हमी कायदा २००५ रद्द केला जाईल. याकडे ग्रामीण रोजगार आणि उपजिविका सुरक्षा या क्षेत्रात मोठा धोरणात्मक बदल करण्यासाठीचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. या विधेयकात सरकारकडून केंद्रीय ग्रामीण रोजगार हमी काऊन्सिल तयार करण्याचा प्रस्ताव आहे. यात एक चेअरमन, केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे प्रतिनिधी, पंचायत राज संस्था, कामगार संघटना आणि समाजातील दुर्बल घटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अशा पंधरा पेक्षा जास्त गैर सरकारी सदस्य आणि भारत सरकारचे सह सचिवपदाच्या खालील एक सदस्य सचिव असणार आहे.

**महात्मा गांधींचे नाव हटवण्यावरून विरोधं**

विरोधी पक्ष काँग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी यांनी सरकारकडून या योजनेला देण्यात आलेले महात्मा गांधी यांचे नाव का हटवण्यात येत आहे असा प्रश्न विचारला आहे. त्या म्हणाल्या, ते महात्मा गांधी यांचे नाव का हटवत आहेत? महात्मा गांधी या देशाचे, जगाचे आणि इतिहासातील सर्वात महान नेत्यांपैकी एक होते. मला कळत नाहीये की सरकार असे काय करते आहे.

-----------

### डॉक्टर गौरी गर्जे प्रकरणात

नसून हत्या असल्याचा गंभीर आरोप केला होता. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनात विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली होती. याच एसआयटीने आता अनंत गर्जे यांना दुसऱ्यांदा अटक करून मोठी कारवाई केली आहे. गौरी गर्जे मृत्यू प्रकरण समोर आल्यानंतर वरळी पोलिसांनी तासाभरातच गर्जे यांना अटक केली होती. तेव्हापासून ते पोलीस कोठडी आणि नंतर न्यायालयीन कोठडीत आहेत. वरळी पोलिसांनी दाखल केलेल्या मूळ प्रकरणात त्यांना अद्याप जामीन मिळालेला नाही. अशा परिस्थितीत, मुख्यमंत्र्यांनी स्थापन केलेल्या एसआयटीने त्यांना पुन्हा अटक केली आहे. ही दुसरी अटक एसआयटीच्या स्वतंत्र तपासाचा भाग आहे. डीसीपी रागसुधा यांच्या नेतृत्वाखालील एसआयटी पुढील तपास करत आहे. एसआयटीच्या या कारवाईमुळे या प्रकरणाला आता वेगळी कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. एसआयटीच्या तपासात आता कोणती नवीन माहिती समोर येते आणि या प्रकरणाचे गूढ कसे उलगडते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

-------------

### विद्यार्थ्यांना मारल्यास

कठोर नियम लागू करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे आता राज्यातील सर्व शाळांना विद्यार्थ्यांशी सन्मानपूर्वक आणि संवेदनशीलपणे वागणे बंधनकारक असणार आहे.राज्य सरकारने या नवीन सरकारी आदेशात जुन्या शिक्षण हक्क कायद्यातील नियमांवर पुन्हा भर देण्यात आला आहे. हा शासन निर्णय काढून शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम १७ च्या तरतुदींना अधिक बळ देण्यात आले आहे. यानुसार आता विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा, मारहाण किंवा मानसिक त्रास, छळ करणे, अपमान करणे आता पूर्णपणे मनाई असणार आहे. त्यामुळे शिक्षक, मुख्याध्यापक किंवा कंत्राटी कर्मचारी कोणालाही विद्यार्थ्यांना शिक्षा देण्याचा अधिकार राहिलेला नाही. फोटो आणि मेसेजबाबत कडक नियमतसेच आता विद्यार्थ्यांना टोमणे मारणे, शिवीगाळ करणे, अपमान करणे किंवा त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होईल असे मानसिक त्रास देणारे वर्तन करणे यावर सक्त बंदी घालण्यात आली आहे. त्यासोबतच शैक्षणिक कामगिरी, जात, धर्म, लिंग, भाषा, अपंगत्व किंवा सामाजिक-आर्थिक स्थिती या कोणत्याही आधारावर विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव करणे हा देखील गुन्हा मानला जाईल. हा नियम शिक्षक, मुख्याध्यापक, तसेच तात्पुरते किंवा कंत्राटी काम करणारे कर्मचारी सर्वांना लागू असेल.विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कर्मचाऱ्यांवर खास निर्बंध लावण्यात आले आहेत. शिक्षकांनी कामाशिवाय विद्यार्थ्यांशी वैयक्तिक मेसेज, चॅट किंवा सोशल मीडियावर बोलणे बंद करायचे आहे. विद्यार्थ्यांचे फोटो किंवा व्हिडिओ त्यांच्या पालकांच्या परवानगीशिवाय वापरता येणार नाहीत. तसेच मुलांचे मार्कशीट किंवा इतर खासगी माहिती खूप काळजीपूर्वक गोपनीयता राखून हाताळावी. शाळेत तक्रार निवारण यंत्रणा तयार करणे गरजेचे असून या ठिकाणी ठरलेल्या वेळेत तक्रारी सोडवणं गरजेचे असणार आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५


## थोडक्यात



### कुंभार समाज सशक्तीकरणाचा निर्धार : आष्टीत विद्युत चाकांचे वाटप व प्रशिक्षणातून नवी दिशा

आष्टी । प्रतिनिधी

खादी व ग्रामोद्योग आयोग, महाराष्ट्र राज्य कार्यालय (मुंबई) आणि केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी येथे आयोजित 'ग्रामोद्योग विकास योजना' अंतर्गत झालेल्या 'कुंभार सशक्तीकरण कार्यक्रम' मध्ये सहभागी झालो. या कार्यक्रमात २० लाभार्थ्यांना विद्युत कुंभार चाकांचे वाटप करण्यात आले.

पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपारिक कारागिरांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या धर्तीवर, कुंभार समाजाच्या हाताला सातत्यपूर्ण काम आणि कलेला आधुनिक संधी मिळावी, हा उद्देश आहे. भविष्यात कर्नाटकातून उच्च दर्जाची माती उपलब्ध करून देणे, तसेच प्रगत प्रशिक्षणाची सोय निर्माण करणे, यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील. माती कलेचे महत्त्व वाढत असून, एकत्रितपणे हा व्यवसाय केल्यास समाजाला आर्थिकदृष्ट्या बळकटी मिळू शकते.प्रशिक्षण शिबिरातून कारागिरांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळाले असून, पुढील टप्प्यात प्रगत प्रशिक्षण, आवश्यक यंत्रसामग्री आणि अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे.कुंभारसशक्तीकरण ग्रामोद्योगविकासयोजना आष्टी कारागिरसशक्तीकरण विद्युतकुंभारचाक कौशल्यविकास स्वरोजगार ग्रामीणविकास आत्मनिर्भरभारत बीड

### शंकरराव फपाळ यांचे निधन

वडवणी । प्रतिनिधी



माजलगाव तालुक्यातील बेलुरा गांवचे रहिवासी वारकरी संप्रदायातील शांत व मनमिळाऊ स्वभावाचे फपाळ कुटुंबाचे आधारवड तथा माजलगाव शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन रमेश फपाळ यांचे वडील शंकरराव फपाळ यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी माजलगाव या ठिकाणी राहत्या घरी शनिवारी दि.१३ रोजी सायंकाळी ०७:०० वाजता वृद्धपकाळामुळे दुःखद निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर रविवार दि.१४ /१२ / २०२५ रोजी मंगलनाथ स्मशानभूमी माजलगाव येथे हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीमध्ये अंत्यसंस्कार झाले त्यांच्या पश्चात ०४ मुले अंगदराव, त्र्यंबकराव,रमेशराव,अंकुशराव व ०१ मुलगी सौ.पुष्पाताई प्रकाशराव नखाते आवरगाव सुना,नातवंडे,पंणतू असा मोठा परिवार आहे. स्व.शंकरराव यांच्या निधनाने फपाळ कुटुंबावर शोककळा पसरली आहे. या दुःखाच्या कठीण प्रसंगातून फपाळ कुटुंबाला बाहेर पडण्यासाठी ईश्वर त्यांना बळ देवो हीच प्रार्थना.



### होळच्या शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेचे मल्ल जिल्हा कुमार कुस्ती स्पर्धेत चमकले

बीड । प्रतिनिधी

आष्टी येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुमार कुस्ती स्पर्धेत केज तालुक्यातील होळ येथील शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेच्या मल्लांनी उल्लेखनीय यश संपादन करून नाव उज्ज्वल केले आहे. या स्पर्धेत यशराज रत्नाकर मुंडे यांनी ८० किलो वजन गटात उत्कृष्ट कुस्ती दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. तसेच, शिवम दत्ता धोंगडे यांनी ६० किलो वजन गटात दमदार कामगिरी करत छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कुमार कुस्ती स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. या यशाबद्दल दोन्ही पैलवानांचे क्रीडा प्रेमी, प्रशिक्षक, सहकारी मल्ल तसेच शिवछत्रपती क्रीडा व्यायामशाळेच्यावतीने अभिनंदन करण्यात आले. आगामी राज्यस्तरीय तसेच कुमार महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात नित्रुडचा सहभाग

## ग्रामस्थांच्या प्रयत्नातून गाव विकासाच्या महामार्गावर!

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील नित्रुड ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत गावात विकासाची नवी लाट निर्माण केली आहे. ग्रामपंचायत प्रशासन,सरपंच दत्ता काका डाके व सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि गावकरी यांच्या एकजुटीने आणि लोकसहभागातून नित्रुड गावात विविध लोकोपयोगी उपक्रम आणि विकासकामे वेगाने राबविली जात असून, गावाचा चेहरामोहरा बदलत आहे.

**लोकाभिमुख उपक्रम आणि सुविधा:**

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला असून, यात प्रामुख्याने आयुष्यमान भारत कार्ड शिबिर आणि आरोग्य व फिटनेस शिबिराचे आयोजन करण्यात आले, ज्याचा लाभ शेकडो ग्रामस्थांनी घेतला. विशेष म्हणजे, घरपट्टी आणि पाणीपट्टी भरणाऱ्यांसाठी ५०% सवलत जाहीर करून ग्रामपंचायतीने कर संकलनात एक आदर्श पायंडा पाडला आहे.



**शेतकरी आणि महिला सक्षमीकरण:**

गावाचा कणा असलेल्या शेतकऱ्यांसाठी पोकरा () व इतर योजनांबाबत शेतकरी मेळावा व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच, गावातील महिला बचत गटांना बळ देण्यासाठी लखपती दीदी योजना व विविध व्यवसायांचे मार्गदर्शन करून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे.

**स्वच्छता आणि सुशोभिकरण:**

स्वच्छ गाव, सुंदर गाव ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी गावात मोठी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये रस्ते सफाई, सांडपाणी व्यवस्थापन (नाल्यांची सफाई) आणि घनकचरा व्यवस्थापन केले जात आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी स्मशानभूमी, कब्रस्तान, आणि मंदिर-मस्जिद परिसरात वृक्षारोपण करून ही धार्मिक स्थळे स्वच्छ करण्यात आली आहेत. तेथे पाणी, वीज आणि बसण्यासाठी बाकड्यांची सोयही करण्यात आली आहे. झाडांना रंग देणे आणि भिंतींवर बोलकी चित्रे ( ) काढून गावाला सुशोभित करण्यात आले आहे.

**प्रशासकीय पारदर्शकता आणि आधुनिकता:**

नित्रुड ग्रामपंचायतीने कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी स्वतंत्र वेबसाईट सुरू केली असून, ग्रामस्थांना सर्व दाखले आणि सेवा आता ऑनलाईन मिळत आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने गावात कॅमेरे बसवने चालू आहेत.विविध महापुरुषांचे जयंती साजरी करून त्यादिवशी विविध कार्यक्रम घेण्यात येतात तसेच, ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच, ग्रामसेवक, संगणक परिचालक आणि कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र केबिनची व्यवस्था करून कार्यालयीन कामकाज अधिक शिस्तबद्ध केले आहे.

**पायाभूत सुविधा:**

गावातील पिण्याच्या पाण्याचा आणि विजेचा प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देण्यात आले असून, घरकुल आणि मनरेगा योजनेची कामे वेगाने पूर्ण करून लाभार्थ्यांना त्यांचे हप्ते वेळेवर मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत कटिबद्ध आहे. शाळा, अंगणवाडी आणि शासकीय कार्यालयांची स्वच्छता करून तेथे सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

नित्रुड ग्रामपंचायतीची ही वाटचाल विकसित गाव संकल्पनेकडे वेगाने सुरू असून, ग्रामस्थांमध्ये यामुळे मोठा उत्साह निर्माण झाला आहे व एक पाऊल शाश्वत विकासाकडे नित्रुड ग्रामपंचायतची वाटचाल सुरू आहे.

## जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धेत खेळाडूंनी दाखवली चित्तथरारक प्रात्यक्षिके

### डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धेसाठी बीड जिल्हा संघ निवड चाचणी व अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी तायक्वांदो खेळाडूंनी चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली . डॉ. योगेश क्षीरसागर यांनी या जिल्हास्तरीय सब ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले, अशी माहिती तायक्वांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली.

छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल बीड येथील बहुउद्देशीय हॉल येथे तायक्वांदो असोसिएशन ऑफ बीड आयोजित १२ वर्षे वयोगटातील जिल्हास्तरीय सब ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धा रविवारी पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन डॉ.



श्री. योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला क्रीडा अधिकारी श्री रेवणनाथ शेलार , डॉ. अविनाश बारगजे, जया बारगजे , बन्सी राऊत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या स्पर्धेसाठी जिल्हाभरातून शेकडो विद्यार्थ्यांनी या जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धेत सहभाग नोंदवला. या प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले की, पालकांनी आपल्या पाल्यांना तायक्वांदो सारखे खेळ खेळण्यासाठी प्रेरित करावे. बीड जिल्ह्यातील तायक्वांदो खेळाडूंना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळण्यासोबतच उपजीविकेसाठी शासनाच्या सेवेमध्ये संधी देखील मिळत आहेत. बीडचे हे तायक्वांदो खेळातील वैभव सर्व दूरपर्यंत पोहोचण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. याप्रसंगी राष्ट्रीय पंच शेख अनिस, ऋत्विक तांदळे, देवेंद्र जोशी, बाळासाहेब आंधळे, सुदर्शन गायकवाड, प्रणव कुमार सिरसाट , बालाजी कराड, अंकुश गायकवाड यांनी काम पाहिले. याप्रसंगी १२ वर्षे वयोगटातील विजेत्या खेळाडूंची सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या ३५ व्या राज्यस्तरीय सब ज्युनिअर तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे , अशी माहिती तायक्वांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र ( मुंबई ) संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंची यादी –

मुलांचा संघ– सर्वेश पवार, आरुष तागड, अद्वेत शेटे, कार्तिक आंधळे, युगंधर क्षीरसागर , देवेंद्र लोहारे , निखिल आंधळे, नीरज धोंडगे, एकांश सोनवणे, यश भाकरे.

मुलींचा संघ – स्वरा राठोड, श्रीनिधी वारे, जानवी राठोड, सम्राज्ञ वडमारे, दूर्वा पवार, सान्वी राठोड , राघवी रामदासी , शरयू शेळके, आशरीन कलावत, स्वस्तिश्री बिल्पे, जोया शेख, स्वरा चंदनशिव यांची निवड झाली आहे.

पान ६ वरुन...

### आचारसंहितेच्या काळात

अजय सरवदे यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

आचारसंहितेच्या कालावधीत प्रसिद्ध झालेली सदर महा–ई–टेंडर निविदा तात्काळ रद्द करण्यात यावी, आचारसंहिता भंग करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून अहवाल सार्वजनिक करण्यात यावा.तसेच, तात्काळ व ठोस कारवाई न झाल्यास हे प्रकरण मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे सादर करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आल्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.प्रश्न एकच आचारसंहिता फक्त कागदापुरती आहे का, की प्रशासनालाही ती बंधनकारक आहे? बीडमधील या प्रकरणाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पतंगासाठी नायलॉन

केले. काही अनुचित प्रकार घडल्यास विक्रेता व पतंग उडवणाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात येतील असे स्पष्ट निर्देश ढाकणे यांनी दिले.

पतंग प्रेमी पतंग उडवताना आपला पतंग तुटू नये यासाठी नायलॉन मांजाचा वापर करतात. यामुळे मानवी व प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण होतो. यामुळे अनेकांचे प्राण गेल्याच्या दुर्दैवी घटना यापुर्वी विविध ठिकाणी घडलेल्या असून पतंग उडवताना साधा दोरा विक्री व वापरण्याचे निर्देश विक्रेत्यांना व नागरिकांना दिले आहेत.

–सपोनि महादेव ढाकणे,पोलीस स्टेशन दिंद्रुड

### भाऊ–बाबा पुण्यतिथीनिमित्त

२१ डिसेंबर रोजी विनोदाचार्य ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगावकर (कर्जत),दि.२२ डिसेंबर रोजी विनोदाचार्य ह.भ.प.माऊली महाराज पठाडे (कर्जत), दि.२३ डिसेंबर रोजी धर्मभूषण ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे (माणिकदौडी),दि.२४ डिसेंबर रोजी गणेशगड संस्थांचे अध्यक्ष ह.भ.प.महंत काशिनाथ महाराज (नागतळा) यांचे रात्री ७ ते ९ यावेळात हरिकीर्तन होणार आहे. गुरुवार दि.२५ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत संतकृपा वारकरी शिक्षण संस्था,संत वामनभाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष ह.भ.प.ब्रह्मचैतन्य महाराज तावरे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर सामुदायिक महाप्रसाद होणार आहे.यावेळी आ. सुरेश धस, माजी आ.बाळासाहेब आजबे,माजी आ.भीमराव धोंडे, माजी आ.साहेबराव दरेकर हे उपस्थित राहणार आहेत.या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन संत वामनभाऊ मित्र मंडळ आष्टी व परिसरातील ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

### पाटोदा शहरातील

जनतेकडे डोळे उघडून पाहायलाही तयार नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. लहान मुलांचे भवितव्य धोक्यात असताना नगरपंचायत कोणतीही ठोस भूमिका घेत नसल्यामुळे संताप वाढत आहे. शहरातील सर्व अंगणवाड्यांसाठी कायमस्वरूपी, सुरक्षित व प्रशस्त इमारती तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी पालक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

### पाटोदा–मांजरसुंबा

रस्त्याचे काम पूर्ण न होता देखील टोल नाक्यावर वसुली सुरू आहे. स्थानिक नागरिकांसाठी सवलत किंवा लोकल टोल पासची योग्य व्यवस्था नसतानाही वाहनचालकांकडून जबरदस्तीने टोल वसूल केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, आवश्यक साईड पट्टे, पांढरे पट्टे, रेडियम चिन्हे व रिफ्लेक्टर बसवावेत तसेच रस्ता पूर्ण होईपर्यंत टोल वसुली थांबवावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. संबंधित प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### चिंचवण रोडवरील 'सिमेंट'

कलर पट्टे देण्यात आले आहेत. परंतु या रस्त्यावर फेरफटका मारला तर या रस्त्यावर जागोजागी प्रचंड अशा भेंगा पडल्याच्या दिसून येत आहेत. या रस्त्याला अगोदरच भरपूर वर्षानंतर मुहूर्त भेटला आहे. जो रस्ता झाला आहे तो अत्यंत निकृष्ट आणि अकॉलिटी झाला असल्याचे जनतेमधून बोलले जात आहे. या रस्त्यावर भेंगा पडल्याने सध्या तरी त्याचा त्रास सहन करावा लागत नसला तरी येणाऱ्या काही दिवसातच सदरील भेंगा मोठ्या भेगांना आमंत्रण देणार आहेत ? यात तीळ मात्र शंका नाही. याकडे संबंधित बांधकाम विभागाचे लक्ष नसल्याचे देखील दिसून येत आहे. तर या नावीन्यपूर्ण झालेल्या नवीन रस्त्या कामाच्या बाबतीत दोष कोणाला द्यायचा? रस्त्याला की संबंधित शासकीय बांधकाम विभागाला अथवा गुत्तेदाराला असा प्रश्न सध्यातरी उपस्थित राहत आहे.

या रोडचे देखरेखीचे काम गेवराई येथील बांधकाम विभागाकडे आसुन याची माहीती घेण्यासाठी अभियंता रुषीकेश चिरके यांच्याशी अनेकांनी फोनवरून संपर्क केला आसता ते फोन घेत नाहीत.फोन का घेत नाहीत असा प्रश्न पडला आहे?

### महात्मा फुले युवा दलाचा

व्यक्तींचा मोलाचा सहभाग लाभला. तरीही अनेक अडचणी आहेत. अशा पुरस्कारांमुळे आमच्या कार्याला नवी ऊर्जा व दिशा मिळते. बुद्धशिवफुलेशाहूआंबेडकर यांच्या विचारांवरच समाजात न्याय व बंधुता निर्माण होईल.''यावेळी सौ. संध्या बारगजे म्हणाल्या, ''हा पुरस्कार आमच्यासाठी अत्यंत मोलाचा असून तो कायम आमच्या हृदयात राहील. महापुरुषांनी सांगितलेल्या मूल्यांनुसारच आम्ही काम करत आहोत आणि पुढेही करत राहू.''या कार्यक्रमास महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे, नामदेवराव दुधाळ, नाळवंडीचे सरपंच ॲड. राजेंद्र राऊत, बीड जिल्हा उपप्रमुख संजय काळे, पाटोदा तालुकाप्रमुख गणेश मोहळकर, सुलतानपूर चे सरपंच धनेश्वर खेत्रे ,महादेव दुधाळ, रमेशराव दुधाळ, मोहनराव गोरे, सतीश मोहोळकर, सुरेश राऊत, आकाश मोहळकर , सुधीर शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक लक्ष्मण गुंजाळ यांनी केले व आभार प्रदर्शन महात्मा फुले युवा दल बीड जिल्हा उपप्रमुख संजय काळे यांनी केले यावेळी आनंदग्रामचे विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आजचा दिवस व्यक्तीचे स्वातंत्र्य अधोरेखित करणारा –प्रा.डॉ.सिद्धेश्वर सटाले

गेवराई । प्रतिनिधी

जागतिक मानवी हक्क दिन हा प्रत्येक व्यक्तीचा सन्मान, समानता आणि स्वातंत्र्य अधोरेखित करणारा दिवस आहे. असे प्रतिपादन प्रा. डॉ. सिद्धेश्वर सटाले यांनी केले. ते महिला महाविद्यालय, गेवराई च्या राज्यशास्त्र विभाग द्वारे आयोजित जागतिक मानवी हक्क दिन कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे व राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. शिवाजी दिवाण होते.



१० डिसेंबर हा जागतिक मानवी हक्क दिन म्हणून जगभर साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या राज्यशास्त्र विभाग द्वारे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. सिद्धेश्वर सटाले म्हणाले की, १९४८ मध्ये आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र संघाने मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेचा स्वीकार केला. म्हणून १० डिसेंबर हा जागतिक मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने व्यक्तीची समानता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेवर जोर दिला जातो. त्यामुळे आजचा दिवस हा खऱ्या अर्थाने व्यक्तीचे स्वातंत्र्य अधोरेखित करणारा दिवस आहे. असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे म्हणाले की, मानवी हक्क सर्वांना त्यांची जात, लिंग, राष्ट्रीयत्व किंवा इतर कोणत्याही भेद–भावाशिवाय, जन्माने मिळालेले मूलभूत हक्क आहेत. ज्यात जगण्याचा, स्वातंत्र्याचा, शिक्षणाचा, आरोग्याचा, मत आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार तसेच गुलामगिरी आणि छळापासून मुक्तता यांचा समावेश होतो.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शिवाजी दिवाण यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. बाबू वादे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक–शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी यांची उपस्थिती होती.

## नामस्मरण केल्याने मनुष्याला मोक्ष मिळतो – ह.भ.प.धर्मराज महाराज

चौसाळा । प्रतिनिधी

मनुष्य जीवनात सुख मिळविण्यासाठी सतत प्रयत्न करतो. खरे सुख व मोक्ष प्राप्तीसाठी चिंतन व नामस्मरण केल्याने मिळते असे प्रतिपादन गुरुपीठ सामनगाव संस्थांचे संस्थापक ह.भ.प धर्मराज दादा महाराज सामनगावकर यांनी व्यक्त केले ते चौसाळा तालुका बीड येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा श्रमिक दूध संस्थेचे चेअरमन चंद्रसेन गुंजाळ, शहाजी गुंजाळ, शिवाजी गुंजाळ यांच्या मातोश्री स्वर्गीय चतुराबाई गुंजाळ यांच्या प्रथम वर्षश्राद्ध निमित्ताने ह.भ.प. धर्मराज दादा महाराज यांचे १५ डिसेंबर रोजी चौसाळा येथे कीर्तन संपन्न झाले. सदर कीर्तनात महाराजांनी

उतरलो पार, सत्य झाला हा निर्धार!

तुझे नाम धरीले कटी, केली संसाराची तुटी!

या अभंगावर कीर्तन केले आपल्या कीर्तनातून महाराजांनी सांगितले की, मनुष्य जीवनात जन्म झाल्यापासून शेवट मोक्ष प्राप्ती पर्यंत एकूण सोळा संस्कार आहेत. यावर स्पष्टीकरण देऊन त्यांनी सांगितले की, आज कालच्या आधुनिक जीवनात माणूस जुने विचार, रुढी, परंपरा विसरत जात आहे. खरे सुख व मोक्ष प्राप्तीसाठी चिंतन व नामस्मरण हे मार्ग सोपे असून मनुष्य जन्माला आलेल्या प्रत्येकाला आज ना उद्या कधी ना कधी सर्वांना जायचेच आहे जेव्हा आपणास जावे लागणार आहे तेव्हा जन्म आहे तसा मृत्यू आपल्याबरोबरच आहे हे विसरता कामा नये असे त्यांनी स्पष्ट केले. सदरील प्रथम वर्षश्राद्ध पर आयोजित कीर्तन कार्यक्रमाला ह.भ.प रणजीत महाराज शिंदे, ह.भ.प. नामदेव महाराज कवडे, हरिभाऊ काळे, रामदास गव्हाणे, मृदंगाचार्य संदीप आमटे, बापू गोपने, यांच्यासह चौसाळा येथील ज्येष्ठ पत्रकार एन. टी. वाघमारे, विलास महाराज शिंदे, पंजाबराव शिंदे, अशोक लोढा, डॉ. दिलीप मोठे, डॉ. अंकुश मंचुके, नाथा नाईकवाडे, ह.भ.प. कल्याण नाईकवाडे, श्री माने सर, जना बापू कळासे, दत्तू कळासे, राम सर्वज्ञ, कल्याणराव जोगदंड यांच्यासह गावकरी, नातेवाईक, मित्रपरिवार आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# राज्यस्तरीय प्रश्नमंजूषेत आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा ठसा

## विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेने आणि अभ्यासपूर्ण तयारीने उंचावला महाविद्यालयाचा नावलौकिक

बीड । प्रतिनिधी

आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, बीड येथील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय आयुर्वेद प्रश्नमंजूषेमध्ये घवघवीत यश संपादन करत महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेला उजाळा दिला. प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय व श्री एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव तसेच आयुर्वेद व्यासपीठ शाखा, अहिल्या नगर यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी शेवगाव येथे ही राज्यस्तरीय आयुर्वेद प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेत राज्यभरातील विविध आयुर्वेद महाविद्यालयांतील बी.ए.एम.एस. विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या आणि अभ्यासपूर्ण झालेल्या या स्पर्धेत आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत महाराष्ट्र पातळीवर महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला. महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष बी.ए.एम.एस. ची विद्यार्थिनी किरण जगताप हिने सर्वोत्कृष्ट स्पर्धकाचा मान पटकावला.

या स्पर्धेसाठी आदित्य आयुर्वेद महाविद्यालया कडून तीन संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील प्रत्येकी एक विद्यार्थी सहभागी होता. आयुर्वेदाच्या विविध संहितांवर आधारित प्रश्नसंच तयार करण्यात आला होता. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी मागील तीन महिन्यांपासून सातत्यपूर्ण आणि कठोर परिश्रम घेतले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य वैद्य विवेक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थ्यांना या स्पर्धेसाठी विशेष प्रोत्साहन दिले होते. या यशामुळे महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनाही नवी प्रेरणा मिळाली. या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थांचे विशेष अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या सभागृहात विजेत्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य वैद्य विवेक कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, अभ्यासात सातत्य ठेवले तर दृष्टी व्यापक होते आणि ज्ञानाला नवे आयाम प्राप्त होतात, असे गौरवोद्गार काढले. राज्यस्तरीय यशामुळे आदित्य आयुर्वेद महाविद्यालय, बीडने पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची ठळक छाप उमटवली आहे.



### डॉ. आदिती सारडा यांच्याकडून विद्यार्थांचे कौतूक

राज्यस्तरीय आयुर्वेद प्रश्नमंजूषेमध्ये आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश अभिमानास्पद असल्याचे मत संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाची, शिस्तबद्ध तयारीची आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाची ही फलश्रुती असल्याचे त्यांनी सांगितले. अशाच प्रकारे ध्येय निश्चित ठेवून गुणवत्ता, आत्मविश्वास आणि परिश्रमाच्या जोरावर वाटचाल केल्यास भविष्यातही मोठी यशस्वी कामगिरी घडेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

cmyk

# सगळा महाराष्ट्र लुटून झाला, आता बाजार समित्या तरी शिल्लक ठेवा !

## सरकारच्या त्या निर्णयावरुन राजू शेट्टींची मुख्यमंत्र्यांवर सडकून टीका

पुणे । प्रतिनिधी

विधिमंडळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील ८० हजार मेट्रीक टनापेक्षा जास्त उलाढाल करणाऱ्या महत्त्वाच्या बाजार समिती अध्यक्षपदी मंत्री आणि उपाध्यक्षपदी राज्यमंत्री तर सदस्य म्हणून काही आयएएस अधिकारी व दोन ते तीन शेतकरी प्रतिनिधी ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यावरुन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सरकारवर सडकून टीका केली.

सगळा महाराष्ट्र लुटून झाला आता शेतकऱ्यांच्या बाजार समिती तरी शिल्लक ठेवा असे शेट्टी म्हणाले. इथेही लुटता यावे म्हणून मंत्री राज्यमंत्री नेमता काय? असा सवाल त्यांनी केला. यात आयएएस अधिकाऱ्यांचे आम्ही स्वागत करू मात्र मंत्री आणि राज्यमंत्र्यांचे इथे काय काम अशी टीका त्यांनी केली. जर मंथनियन राज्यमंत्री नेमत असेल तर शेतकऱ्यांनी मते देऊन निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे काय असा सवाल करताना





बाजार समिती या चराऊ कुरणे आहेत. त्यात फक्त चरण्याचा अधिकार या पांढऱ्या हत्ती सारख्या पोसलेल्या मंत्र्यांचा आहे का ? असा संतप्त सवालही त्यांनी केला. सरकारने या घेतलेल्या निर्णयाचा आम्ही जाहीर निषेध करत असल्याचेही राजू शेट्टी यांनी सांगितले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्वात मोठे ब्लॅकमेलर असल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. गेल्या सहा दिवसापासून पंढरपूर तालुक्यातील वाखरी इथंऊस दरासाठी सुरु असलेले आमरण उपोषण राजू शेट्टी आणि रविकांत तुपकर यांच्या उपस्थितीत सुटले. यानतर बोलताना राजू शेट्टींनी सरकारवर टीका केली. मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १५ रुपये द्या नाहीतर काटामारी बाहेर काढू असे म्हणणारे मुख्यमंत्री हेच सर्वात मोठे ब्लॅकमेलर असल्याचे शेट्टी म्हणाले. ऊसाला पहिली उचल साडेतीन हजार रुपये मिळावी यासाठी गेल्या सहा दिवसापासून समाधान फाटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वाखरी येते आमरण उपोषण सुरू केले होते. आज जिल्ह्यातील १५ पेक्षा जास्त साखर कारखान्यांनी पहिली उचल तीन हजार रुपये देण्याचे जाहीर केल्यानंतर राजू शेट्टी आणि रविकांत तुपकर यांनी आंदोलकांना लिंबू पाणी देत त्यांचे आमरण उपोषण सोडवले. यावेळी बोलताना राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री आणि सरकारवर सडकून टीका केली.

## गायींच्या या जाती आहेत फायदेशीर, दररोज ५० लिटरहून अधिक दूध



सध्या भारतात दुग्ध व्यवसाय झपाट्याने विस्तारत आहे. दुधाच्या व्यवसायातून लोकांना महिन्याभरात लाखोंचा नफा मिळत आहे. हा व्यवसाय करण्यासाठी तंत्रज्ञान आणि ज्ञान देखील आवश्यक आहे. जर तुम्ही योग्य जनावरांपासून हा व्यवसाय सुरू केलात तरच तुम्हाला नफा मिळू शकेल, अन्यथा तुम्हाला त्यात इतका पैसा मिळू शकणार नाही. गायींच्या संगोपनासाठी सरकारकडून मदत मिळणार आहे, याचा अर्थ हा व्यवसाय सुरू करण्यासाठी तुम्हाला जास्त गुंतवणूक करावी लागणार नाही.

गीर गाय : ही भारतातील सर्वाधिक दूध देणारी गाय आहे. या जातीच्या गायींचे कासे जास्त मोठे असतात. ही गाय गुजरातच्या गीर जंगलात आढळते. मात्र, आता भारतभर त्याची लागवड केली जात आहे. ही गाय दररोज सरासरी १२ ते २० लिटर दूध देते. मात्र या गायीची योग्य काळजी घेतल्यास ही गाय दररोज ५० ते ६० लिटर दूधही देऊ शकते असे दिसून आले आहे. तेव्हा विचार करा, अशा तीन ते चार गायी पाळल्या तर महिन्याभरात फक्त त्यांचे दूध विकून किती नफा कमावता येईल.

लाल सिंधी गाय : नावावरूनच ही लाल सिंधी गाय सिंध प्रांतात आढळते. त्याचबरोबर ही गाय थोडीशी लाल रंगाची असल्याने या गायीला लाल सिंधी गाय म्हणतात. सध्या ही गाय हरियाणा, कर्नाटक, केरळ, ओडिशा आणि पंजाबमध्येही मोठ्या प्रमाणात पाळली जाते. यूपी आणि बिहारमधील काही शेतकरी या गायींच्या संगोपनाचे कामही करत आहेत. ही गाय दररोज १५ ते २० लिटर दूध देते. मात्र, त्याची योग्य काळजी घेतल्यास ते दररोज ४० ते ५० लिटर दूध देऊ शकते.

साहिवाल गाय : उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि हरियाणामध्ये तुम्हाला साहिवाल गाय अधिक आढळेल. या राज्यांतील शेतकऱ्यांमध्ये ही गाय सर्वाधिक लोकप्रिय आहे. ही गाय दररोज सरासरी १० ते १५ लिटर दूध देते, मात्र या गायीची योग्य काळजी घेतल्यास ती दररोज ३० ते ४० लिटर दूध देऊ शकते. या गायीची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे ती कमी जागेतही ठेवता येते आणि तिची जास्त काळजी घेण्याची गरज नसते.

## मार्चपर्यंत ४५ हजार किलोमीटर पाणंद रस्ते पूर्ण होणार; मंत्री गोगावले

पुणे । प्रतिनिधी

राज्यात २०२१ पासून राबवण्यात येत असलेल्या शेत पाणंद रस्ते योजनेअंतर्गत मार्च २०२६ पर्यंत ४५ हजार किलोमीटर रस्ते पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती रोजगार हमी योजना मंत्री गोगावले दिली. आतापर्यंत सुमारे १७ हजार किलोमीटर रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून, २७ ते २८ हजार किलोमीटर रस्त्यांची कामे सध्या सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या योजनेतून केंद्र आणि राज्य सरकारचा निधी थेट कामांवर खर्च करून ग्रामीण भागात रोजगार निर्माण करण्यावर भर दिला जात आहे.




या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार देणे आणि शेतकऱ्यांना थेट लाभ मिळवून देणे. शेत पाणंद रस्त्यांमुळे शेतात जाणे-येणे सोपे होते, शेतमालाची वाहतूक सुलभ होते आणि शेतीची कामे अधिक सोप्या पद्धतीने करता येतात. त्यामुळे हे रस्ते शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी ठरत असल्याचे मंत्री गोगावले यांनी सांगितले. मात्र काही ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने कामे रखडतात किंवा वाद निर्माण होतात. तरीही एकूणच ही योजना यशस्वीपणे राबवली जात असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. राज्यात आतापर्यंत १७ हजार किलोमीटर रस्ते पूर्ण झाले असून उर्वरित कामे वेगाने सुरू आहेत. यंदा मजुरीवर ११ हजार कोटींपेक्षा जास्त खर्च झाला असून, केंद्र सरकारकडून १०० दिवसांच्या मजुरीचा निधी मिळतो. त्यात राज्य सरकार अतिरिक्त निधी देऊन योजना अधिक प्रभावीपणे राबवत आहे. तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत विहिरी, गोठे यांसारख्या कामांसाठी सुमारे १,५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असून, तो येत्या आठ दिवसांत लाभार्थ्यांना वितरित केला जाणार असल्याचेही मंत्री गोगावले यांनी सांगितले.

## ऑफलाइन पद्धतीने ई-पीक पाहणी करण्याची पद्धत

राज्यातील सुमारे २१ टक्के शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केली नव्हती. कारण ऑनलाईन पद्धतीने अनेक अडचणी आल्या होत्या. त्यामुळे अशा शेतकऱ्यांसाठी महसूल विभागाने हा मोठा निर्णय घेतला आहे.

राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत दिलासा देणारी आणि महत्त्वाची बातमी आहे. अनेक शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी ॲपवर आपल्या पिकांची नोंदणी केलेली नाही. अशा शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी ॲपवर नोंदणी केली नाही, त्यांच्यासाठी ऑफलाईन पद्धतीने नोंदणी



करण्याची मुदत वाढवण्यात आली आहे. या निर्णयामुळे तांत्रिक अडचणी, स्मार्टफोनचा अभाव किंवा इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या समस्येमुळे ॲपवर नोंदणी करू न शकलेल्या सुमारे २१ टक्के शेतकऱ्यांची चिंता दूर झाली आहे.

ऑफलाईन ई-पीक पाहणी करण्याची नेमकी प्रोसेस : ई-पीक पाहणी ॲपवर नोंदणी न करू शकलेल्या शेतकऱ्यांना आता तलाठी कार्यालयात जाऊन ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. संबंधिते शेतकऱ्यांनी आपल्या गावातील तलाठी कार्यालय किंवा कृषी सहाय्यक यांच्याकडे संपर्क साधावा. तलाठी किंवा कृषी सहाय्यक यांच्या मदतीने शेतकरी आपल्या शेतातील पिकांची अचूक माहिती (उदा. पिकाचे नाव, लागवडीची तारीख, क्षेत्र) नोंदवून घेऊ शकतील. या पद्धतीने शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी ऑफलाईन पद्धतीने पूर्ण होईल. या सुविधेमुळे आता प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या पिकाची नोंदणी करणे शक्य होणार आहे, ज्यामुळे त्यांना शासकीय योजना आणि पीक नुकसानीच्या मदतीसाठी पात्र ठरता येईल.

## दोन हजार कोटींची ऊस बिले तत्काळ द्यावीत

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील १६३ साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू होऊन ४० दिवस होऊन गेले. १ ते १५ नोव्हेंबरअखेर गाळप केलेल्या उसाची जवळपास दोन हजार कोटी रुपयांची उस बिले कारखान्यांनी थकविली आहेत. यामुळे तातडीने संबंधित साखर कारखान्यांवर आरआरसीअंतर्गत कारवाई करून शेतकऱ्यांची थकित ऊसबिले तातडीने द्यावीत, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी साखर आयुक्तांकडे गुरुवारी निवेदनाद्वारे केली.

साखर आयुक्तांना पाठविलेल्या निवेदनात श्री. शेट्टी यांनी म्हटले आहे, ''राज्यातील साखर कारखान्यांचा गळीत हंगाम १ नोव्हेंबरपासून सुरू झाला. चालू वर्षीच्या गळीत हंगामात १६३ साखर कारखान्यांनी १५ नोव्हेंबरअखेर एक कोटी १० लाख टन उसाचे गाळप केले आहे. यापैकी ३४ साखर कारखान्यांनी १०० टक्के एफआरपी अदा केली असून, १२९ साखर कारखान्यांकडे



जवळपास २००५ कोटी रुपयाची एफआरपी थकबाकी राहिलेली आहे. यामुळे या थकित एफआरपीची रक्कम १५ टक्के व्याजासह शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावीत.'' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयात एकरकमी एफआरपीविरोधात आव्हान याचिका दाखल करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तीन टप्प्यांत एफआरपी देण्याची मागणी केली आहे. या याचिकेची सुनावणी सुरू असून, १७ डिसेंबरला सुनावणी होणार आहे. ९ नोव्हेंबरला झालेल्या सुनावणीमध्ये राज्य सरकार, साखर संघ तसेच साखर कारखान्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयास स्थगिती देण्याची मागणी केली. न्यायालयाने याबद्दल तातडीने सुनावणी ठेवली आहे. सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करून साखर कारखान्यांना पाठीशी घातल्याने साखर कारखाने एफआरपी देण्यास टाळाटाळ करत आहेत, असे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. विशेषतः मराठवाडा व विदर्भासह सोलापूर व पुणे जिल्ह्यांतील कारखान्यांची एफआरपी जादा थकित राहिलेली असून, स्वाभिमानीच्या रेट्यामुळे सांगली, कोल्हापुरातील कारखान्यांनी एकरकमी एफआरपी अदा केली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.




### जागतिक दिवस
### बांगला देशचा स्वातंत्र्यदिन
### भारतीय विजय दिवस

### महत्वाच्या घटना

१४९७ : वास्को-द-गामाने केप ऑफ गुड होपला वळसा घातला.
१७०७ : ला जपान च्या माउंट फुजी या पर्वतावर या दिवशी शेवटचा ज्वालामुखी उद्रेक झाला होता.
१७७३ : अमेरिकन राज्यक्रांती बॉस्टन टी पार्टी
१८५४ : भारतातील पहिल्या इंजिनीअरिंग कॉलेजची स्थापना पुणे येथे झाली.
१९०३ : मुंबईतील ताजमहाल पॅलेस हॉटेल ग्राहकांसाठी खुले करण्यात आले.
१९२८ : मुंबई-पुणे रेल्वे वाहतूक बोगद्यातून सुरु झाली.
१९३२ : 'प्रभात'चा 'मायामच्छिंद्र' हा चित्रपट प्रदर्शित झाला.
१९४५ : ला जपान चे दोन वेळा राहिलेले प्रधानमंत्री फ्युमिमारो कोनी यांनी आत्महत्या केली होती.
१९४६ : थायलँडचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९५१ : ला हैदराबाद चे सालार जंग संग्रहालयाची स्थापना.
१९७१ : भारत - पाक युद्ध, पाक सैन्याची शरणागती, बांगलादेशची निर्मिती
१९८५ : कल्पक्कम येथील 'इंदिरा गांधी अणूसंशोधन केंद्रातील प्रायोगिक 'फास्ट ब्रीडर रिॲक्टर' राष्ट्राला समर्पित.
१९९१ : पुर्वीच्या सोविएत संघराज्यातून फुटून कझाकस्तान हा स्वतंत्र देश झाला.
१९९३ : ला दिल्लीला सर्वांसाठी शिक्षण हे चर्चासत्र पार पडले.
२००६ : अंतराळवीर सुनिता विल्यम यांनी एका सोबत्यासोबत अंतराळयानाच्या बाहेर जाऊन ७ तास ३१ मिनिटात विद्युत प्रणालीची दुरुस्ती केली.
२०१४ : ला पाकिस्तान च्या पेशावर येथे दहशदवादी हल्ल्यात १५० लोकांचा जीव गेला होता त्यामध्ये १३४ लहान मुले होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९६० : चिंतामण गणेश कर्वे - मराठी कोशकार व लेखक, महाराष्ट्र शब्दकोश, महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश, शास्त्रीय परिभाषा कोश यांचे संपादक (जन्म: ४ फेब्रुवारी १८९३)
१९६५ : डब्ल्यू. सॉमरसेट मॉम - इंग्लिश लेखक व नाटककार (जन्म: २५ जानेवारी १८७४)
१९८० : कर्नल सँडर्स - 'केंटुकी फ्राईड चिकन'चे संस्थापक (जन्म: ९ सप्टेंबर १८९०)
२००४ : लक्ष्मीकांत बेर्डे - अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९५४)
२००२ : ला भारतीय अभिनेत्री कव्वाल शकीला बानो यांचे निधन.
२००२ : सर्कस सम्राट काशिनाथ सखाराम तथा बंडोपंत देवल निधन.
२००४ : लक्ष्मीकांत बेर्डे - अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९५४)
२०१३ : ला भारतीय क्रिकेटर मधुसूदन रेगे यांचे निधन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७४९ : छत्रपती शाहू महाराज (जन्म: १८ मे १६८२)
१८५० : स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधानमंत्री आणि पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे निधन. (जन्म: ३१ ऑक्टोबर १८७५)
१८७८ : बेकिंग पावडरचे शोधक आल्फ्रेड बर्ड यांचे निधन.
१९५० : सरदार वल्लभभाई पटेल स्वातंत्र्य सेनानी, स्वतंत्र भारताचे पहिले उपपंतप्रधान व पहिले गृहमंत्री, भारताचे लोहपुरुष, भारतरत्न (मरणोत्तर १९९१) (जन्म: ३१ आक्टोबर १८७५)
१९५२ : ला स्वातंत्र्य सैनिक पोट्टि श्रीरामुलु यांचे निधन.
१९६६ : वॉल्ट इलायन डिस्ने ॲनिमेशनपटांचे प्रणेते, 'मिकी माऊस'चे जनक (जन्म: ५ डिसेंबर १९०१)
१९८५ : शिवसागर रामगुलाम मॉरिशसचे पहिले प्रधानमंत्री (जन्म: १८ सप्टेंबर १९००)
२००० : प्रसिद्ध लेखक तसेच पत्रकार गौर किशोर घोष यांचे निधन.
२०१३ : लोकसभेचे सदस्य सीस राम ओला यांचे निधन.
२०१३ : इंडिअन आयडल च्या दुसऱ्या सीजन चे विजेते संदीप आचार्य यांचे निधन.

## सीताफळ झाडांची निगा कशी राखावी


महाराष्ट्रातील हवामानाचा विचार करता, सिताफळाची लागवड होण्यास भरपूर वाव आहे. अत्यंत कोरडया रखरखीत व उष्ण हवामानाच्या प्रदेशापासून भारी पाऊसमानाच्या हवामाना पर्यंतच्या प्रदेशात सिताफळ वाढते. मात्र उष्ण व कोरडया हवामानातील सिताफळे चविला गोड आणि उत्कृष्ट दर्जाची गुणवत्तेच्या बाबतीत सरस ठरतात असा अनुभव आहे.

कोकणासारख्या जास्त दमटपणा असलेल्या भागाताही हे झाड वाढते. पण अशा हवामानात तेथील फळे आकाराने लहान येतात. कमी पावसाच्या प्रदेशामध्ये डिसेंबर ते फेब्रूवारी या काळात त्याची पान गळती होऊन झाडे विश्रांती घेतात. कडक थंडी व धुके या पिकाला मानवत नाही. थंड हवामानामध्ये फळे घट्ट व टणक राहून पिकत नाहीत. मोहोराच्या काळात कोरडी हवा आवश्यक असते. पावसाळा सुरु झाल्याखेरीज झाडांना फलधारणा होत नाही. सिताफळाचे झाड अवर्षणाला उत्तम प्रतिसाद देत असले तरी अति-अवर्षण मात्र या झाडाला अपायकारक ठरते. साधारणपणे झाडाच्या वाढीसाठी ५०० ते ७५० मिमि पाऊस आवश्यक असतो.

सिताफळाची लागवड ही अवर्षणग्रस्त भागासाठी शिफारस केली असल्यामुळे हेक्टरी फळझाड कोणत्याही जमिनीत येऊ शकते. अगदी खडकाळ रानापासून ते रेताड जमिनीत सुध्दा सिताफळाचे झाड वाढू शकते. अत्यंत हलक्या माळरानात जशी सिताफळाची वाढ चांगली होत, तशीच ही झाडे शेवाळयुक्त जमिनीत गाळमिश्रीत जमिनीत, लाल जमिनीत तसेच अगदी विस्तृत प्रकारच्या जमिनीतही निकोपपणे वाढतात. मात्र भारी, काळी, पाणी साठवून ठेवणारी अल्कलीयुक्त जमिनी या फळझाडाला अयोग्य ठरतात. बागेची निगा : सिताफळाची रोपे लावल्यानंतर काही रोपे मेली असतील तर महिन्याचे आत नांग्या भरून घ्याव्यात. तसे शक्य न झाल्यास पुढील वर्षी जून महिन्यापूर्वी नांग्या भराव्यात.



राज्य लोकतंत्र
# मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.१६ डिसेंबर २०२५ ५



# रक्ताचा तुटवडा भरून काढणे प्रत्येकाचे कर्तव्य-गोयल

## शिबिरात ६४९ नागरिकांची कॅन्सर ,४०० जणांची आरोग्य तपासणी,२३२ दात्यांचे रक्तदान

जालना। प्रतिनिधी

आपलं एक रक्तदान गरजवंतांचा जीव वाचवू शकते.सध्या निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी प्रत्येकाने कर्तव्य भावनेतून रक्तदान केले पाहिजे असे प्रतिपादन उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी केले. राजेश कामड मित्र मंडळाच्या वतीने यंदाही रविवारी ( ता.१४)सलग सहाव्या वर्षी औद्योगिक वसाहतीतील श्री.स्टील इंडस्ट्रीज येथे रक्तदान,कर्करोग निदान , सर्वरोग आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . उद्योजक घनश्यामदास गोयल यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन झाले.या वेळी राजेश कामड,विजय कामड,विनीत साहनी ,सतीश पंच,सी.ए.गोपाल अग्रवाल, गोविंद गोयल,किशोर देवीदान, सुशील पाण्डेय , सुनील बियाणी, पंकज कासलीवाल, पियुष मुंदडा, विनोद कुमावत, विनोद पवार, दीपक भुरेवाल, मोहन इंगळे,रामकुँवर अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.




दिवसभर चाललेल्या शिबिरात जालन्यासह अंबड,गेवराई, देऊळगावराजा, छत्रपती संभाजी नगर येथील रक्तदाते आणि नागरिकांनी सहभागी होत. रक्तदानासह आरोग्य तपासणी केली.

भाजपा शहर जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे,भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विष्णू पाचफुले, अर्जुन गेही,संजय मुथा,नरेंद्र अग्रवाल, पुरुषोत्तम जयपुरिया, सुभाषचंद्र देवीदान, संजय भरतीया, संजय अग्रवाल ( रूपम), रामप्रसाद मुंदडा,राधेश्याम टिबडेवाल, महेंद्र पित्ती, जितेंद्र अग्रवाल, भगवान माथले, जयप्रकाश श्रीमाळी,पवन जोशी, गिंदोडिया, मुकेश गुप्ता, संगीता गुप्ता,सोनल मित्तल, यांच्या सह उद्योग, व्यापार, सहकार, अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिबिरास भेट दिल्याचे राजेश कामड यांनी सांगितले.

डॉ.राजेंद्र गाडेकर, कर्करोग तज्ञ डॉ.आकाश मोर,यांनी कॅन्सर, आरोग्य तपासणी करून आरोग्याची काळजी घेण्या बाबत मार्गदर्शन आणि समुपदेशन केले. शिबीराच्या यशस्वीतेसाठी जनकल्याण रक्तपेढी चे कर्मचारी राजेश कामड, साकेत कामड ,संतोष मुथा, ललित कामड, देवराज कामड, आदींनी परिश्रम घेतले.

सलग सहाव्या वर्षी आयोजित केलेल्या शिबिरात ६४९ नागरिकांची कॅन्सर तपासणी करण्यात आली. २३२ रक्त दात्यांनी रक्तदान केले.तर ४०० जणांची सर्वरोग तपासणी करण्यात आली.विशेष म्हणजे महिलांनी सुध्दा स्वयंस्फूर्तीने रक्तदानाच्या पवित्र कार्यात सहभाग नोंदवला.

# कर्जत आगाराच्या बसचे श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिर येथे स्वागत

पाथर्डी। प्रतिनिधी

कर्जत ( रायगड ) आगाराच्या बसचे श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिर येथे उत्साहात स्वागत. कर्जत (रायगड) आगारातून श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थानासाठी सुरू झालेल्या विशेष बस सेवेचे आज श्रीक्षेत्र मोहटादेवी मंदिर येथे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. या महत्त्वपूर्ण उपक्रमामुळे कर्जत, कामोठे, वाशी, मुंबई परिसर, पुणे परिसर इ. आसपासच्या परिसरातील भाविकांसाठी धार्मिक स्थळे जोडली जाणार असल्यामुळे या भागातील धार्मिक पर्यटनात वाढ होणार आहे.

गर्भगिरी डोंगर पट्ट्यातील बहुतांश नागरिक कर्जत, कामोठे, वाशी, मुंबई परिसर महानगरामध्ये उद्योग व कामांसाठी स्थलांतरीत झालेले आहेत. त्यांना परिसरात येजा करण्यास याद्वारे सुलभ होणार आहे. तसेच आसपासच्या परिसरातील भाविकांना मोहटादेवी व श्रीक्षेत्र कानिफनाथ मढी दर्शन घेण्यासाठी थेट आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध झालेली आहे. यामुळे मोहटादेवी देवस्थानाला भेट देणाऱ्या भाविकांना सोय उपलब्ध झाली आहे. ज्यामुळे स्थानिक पातळीवर



रोजगार निर्मिती होऊन आर्थिक उलाढाल वाढण्यास मदत होईल. तसेच औद्योगिक, प्रशासकीय, शैक्षणिक कार्यासाठी परिसरातील नागरिकांना शहराकडे येजा करण्यास सुलभता येणार आहे. श्री मोहटादेवी देवस्थान विश्वस्त मंडळाच्या वतीने विश्वस्त बाबासाहेब दहिफळे व श्रीकांत लाहोटी यांच्या हस्ते एसटी बसची पूजा करण्यात आली. चालक अजीम पठाण, वाहक आशीर पठाण यांचे देवस्थानच्या वतीने स्वागत करण्यात आले. कर्जत आगाराचे अधिकारी व कर्मचारी यांचे देवस्थानच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, ग्रामस्थ, कर्मचारी, भाविक उपस्थित होते. या बस सेवेचा जास्तीत जास्त भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री मोहटादेवी देवस्थानचे जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे यांनी केले आहे.

# हमारा शौचालय, हमारा भविष्य मोहीम कागदोपत्रीच

## जि.प.कार्यालयात स्वच्छता करत गांधीगिरी आंदोलन



बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद अंतर्गत दि. १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणारी ''हमारा शौचालय, हमारा भविष्य'' ही विशेष मोहीम केवळ कागदोपत्रीच राबविण्यात आल्याचा आरोप करत, तिच्या निषेधार्थ जिल्हा परिषद मुख्य कार्यालयात आज गांधीगिरी पद्धतीने 'शौचालय स्वच्छता मोहीम' राबविण्यात आली. हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाड्यांमध्ये आजही अनेक ठिकाणी शौचालयांचा अभाव असून, काही ठिकाणी असलेली शौचालये वापरण्यायोग्य नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांची शारीरिक व मानसिक कुचंबणा होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. या आंदोलनादरम्यान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, बीडचे पालकमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड,जिल्हाध्यक्ष अशोक येडे ( जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी), नितिन सोनावणे ( महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना बीड), सय्यद सादेक ( बीड शहराध्यक्ष आम आदमी पार्टी) बीड माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनूस, सुदाम तांदळे, शेख मुबीन सहभागी होते. केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिनाचे औचित्य साधून दि. १९ नोव्हेंबर ते १० डिसेंबर २०२५ दरम्यान ''हमारा शौचालय, हमारा भविष्य'' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत बीड जिल्ह्यातील १३५६ गावांमधील वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती व रंगरंगोटी करून ती वापरात आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण तसेच उमेद विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले आहे. मात्र प्रत्यक्षात ही मोहीम कागदोपत्रीच राबविण्यात येत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे.

# बिबट्यांचा वावर वाढल्याने मागणी : श्रीरामपुरातील खासगी व सरकारी जागेतील बाभळींचे जंगल काढा

श्रीरामपूर। प्रतिनिधी

सध्या ऊसाची तोडणी सुरू असल्याने बिबटे लपण्याचे नवीन ठिकाण शोधत आहे, त्यामुळे श्रीरामपूर परिसरात बिबटे फिरताना दिसतात. शहरात म्हाडा कॉलनी, पाटनी मळा, मोरगे वस्ती, गोंधवणी परिसर तसेच तालुक्यातील अनेक गावांमध्ये तसेच रहदारीच्या रस्त्यावर बिबट्याचे दर्शन दररोज होत आहे. बिबटे लपण्यासाठी झाडांचे जंगल शोधत आहे, शहराच्या मध्यभागी असलेल्या अनेक भागांमध्ये खाजगी व सरकारी जागेमध्ये मोठ्या प्रमाणावर वेड्या बाभळीचे झाडे वाढली आहेत ते काढण्याची मागणी होत आहे.



या झाडांमुळे बिबटे शहरात दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे, रात्री घरासमोर अथवा रस्त्यावर खेळणारी लहान मुले यांना पालक घराच्या बाहेर जाऊ देत नाही, ऊस शेतीच्या परिसरात बिबट्यांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. ऊस क्षेत्रात पाण्याचे साठे, ऊसामुळे वास्तव्यासाठी, प्रजननासाठीची अनुकुलता आणि ऊसालगतच शिकारीसाठी शेळी, मेंढी, वासरे, कोंबड्या आदींची उपलब्धता. या सर्व प्रकारच्या अनुकुलतेमुळे बिबटे बागायती भागात स्थिरावले आहेत. बिबटे पुन्हा जंगलाकडे जातील अशी स्थिती नाही. त्यामुळे बिबटे यापुढील काळात नागरी वसाहतीत मुक्कामी राहणार असल्याने ही कायमची समस्या ठरणार आहे. भक्ष्य शोधण्यासाठी बिबट्यांनी शहरी भागातील नागरी वसाहतीत मुक्त फिरताना दिसत आहे. बिबट्यांना पकडण्यासाठी राज्य सरकारने मोहीम हाती घेतली आहे, स्थानिक पातळीवर काही जागरूक नागरिकांनी आमदार हेमंत ओगले, श्रीरामपूर नगरपालिकेचे प्रशासक तथा प्रांताधिकारी किरण पाटील सावंत, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्याशी संपर्क करून भविष्यात जीवित हानी टाळण्यासाठी व बिबट्यांचा त्वरित बंदोबस्त करण्यासाठी शहरात खाजगी व सरकारी जागेवर तयार झालेले झाडाचे जंगल त्वरित काढावे, अशी मागणी केलेली आहे.

# विज्ञान प्रदर्शनात वडाळ्याच्या लिटल स्टार इंग्लिश स्कूलचा प्रथम क्रमांक

जाफराबाद। प्रतिनिधी

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, नवनवीन कल्पना सुचाव्यात, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात लिटल स्टार इंग्लिश स्कूल वडाळा या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला.

या विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील जवळपास ६० शाळांमधील ८३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून तयार केलेले विविध वैज्ञानिक प्रयोग आणि मॉडेल या प्रदर्शनात सादर केले. यामध्ये पर्यावरण पूरक तंत्रज्ञान, जलसंधारण आणि दैनंदिन जीवनातील समस्यावर आधारित उपायांचा समावेश होता. या प्रदर्शनात लिटल स्टार इंग्लिश स्कूलने लाईन ट्रान्समिशन फॉल्ट (आपत्ती व्यवस्थापन) हा प्रयोग प्रदर्शित केला होता. प्रयोगाचा प्रमुख फायदा असा होता की, शाश्वत शेती करणे व ती करत असताना जीवितहानी टाळणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान न होऊ देणे. प्रयोगाचे सादरीकरण व मांडणी बघून उपस्थित निवड समितीने या प्रयोगास प्रथम क्रमांक जाहीर केला. प्रयोगाच्या यशस्वितेसाठी शाळेचे विज्ञान विषयाचे शिक्षक शिवशंकर उबाळे, ऋषिकेश कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी सार्थक लहाने, निखिल शेजोळ यांनी परिश्रम घेतले. या यशासाठी प्राचार्या अनिता नवले यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# शेतकरी हक्क मोर्चासाठी वर्गणी करून येण्याचा वांगीकरांचा निर्धार

बीड। प्रतिनिधी

कापूस व सोयाबीनला रास्त भाव मिळावा, यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य ✽✽''शेतकरी हक्क मोर्चा''✽✽साठी गावागावात जनजागृती सुरू झाली आहे. हा मोर्चा दि. २५ डिसेंबर (गुरुवार) रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान काढण्यात येणार आहे. या मोर्चात जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा सहभाग व्हावा, यासाठी दि. १४ डिसेंबर (रविवार) रोजी वांगी गावात शेतकऱ्यांची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत वांगी गावातील शेतकरी, शेतकरी पुत्र व शेतकरी मित्रांनी लोकवर्गणी जमा करून बीड येथे मोर्चात सहभागी होण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला.

बैठकीत कापसाला १२ हजार रुपये, सोयाबीनला ७ हजार रुपये व तुरीला १२ हजार रुपये किमान हमीभाव मिळावा, सीसीआयकडून होणारी शेतकऱ्यांची अडवणूक तात्काळ थांबवावी, हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच परदेशातून कापूस व सोयाबीन आयातीवर बंदी घालावी, या प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकरी हक्क मोर्चाच्या जागृतीसाठी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, माजी सैनिक अशोक येडे, शेतकरी नेते गणेश नाईकवाडे, राजू गायके, सुहास जायभाये, अर्जुन सोनवणे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. या वेळी वांगी गावातील रतन शेळके, प्रकाश हाडूळे, रामहरी हाडूळे, जीवन शेळके, दिनकर शेळके, महादेव शेळके, बालाभाऊ शेळके, बाळू हाडूळे, ज्ञानेश्वर हाडूळे, गोरख बोनुगुडे, हरभाऊ शेळके, रतन बाजगुडे, तुकाराम शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्र उपस्थित होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/७१८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ८/१२/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) राजु भिमराव पवार २) ललिता राजू पवार सर्व्हे नं.-१० सहन प्लॉट नं. ५ सिटी सर्व्हे नं. २१३७ नं.प.मि.नं.१८-१४७-५ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१४७-५) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. ६
पश्चिम : याच सर्व्हे नं. मधील भाग
दक्षिण- १२ मिटर रुंदीचा
कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः सर्व्हे नं. १२

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# एसबीआय बँकेची लोकअदालत मध्ये २० लाखाची वसुली

अंबड। प्रतिनिधी

अंबड न्यायालय येथे राष्ट्रीय लोक अदालत मध्ये भारतीय स्टेट बँक शाखा अंबड या शाखेचे थकीत कर्ज २० लाख रुपये वसूल झाल्याची माहिती एसबीआय बँकेचे मॅनेजर श्री कौशिक चौधरी यांनी दिली आहे. एसबीआय शाखा अंबड या बँकेकडून व्यापाऱ्यांनी व खाजगी व्यक्तीने घेतलेले कर्ज वेळेवर भरल्या नसल्यामुळे सदरील खातेदार थकीत कर्जामध्ये गेले होते यामुळे बँकेने सवलतीच्या व्याज दरामध्ये सवलत देऊन १३ डिसेंबर रोजी लोकअदालत मध्ये २० ते२२ थकित कर्ज धारकांनी२० लाखाचा भरणा केला.



यामुळे अंबड एसबीआय बँकेची वीस लाखाची वसवली झाली अशी माहिती एसबीआय बँकेचे मुख्य मॅनेजर श्री कौशिक चौधरी यांनी दिली यावेळी बँकेचे कर्मचारी समाधान आंधळे भगवान काकडे यांच्यासह सर्व कर्मचारी यांनी लोकअदालतमध्ये बँकेच्या वसुलीमध्ये सहकार्य केले

# गृहरक्षक दलाच्या वर्धापन दिनानिमित्त खुलताबादला पर्यावरण रक्षणाचा संकल्प



खुलताबाद। प्रतिनिधी

गृहरक्षक दलाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त खुलताबाद येथे वृक्ष लागवड व स्वच्छता अभियान राबवण्यात आले. भद्रा मारुती मंदिर परिसर आणि पोलिस स्टेशन (खुलताबाद) येथे हा उपक्रम पार पडला. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा उद्देश या उपक्रमामागे होता.

अभियानात परिसराची स्वच्छता करण्यात आली. देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमात गृहरक्षक दलाचे अधिकारी व जवान मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी श्रमदान करून परिसर स्वच्छ केला. वृक्ष लागवडीतही सक्रिय सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला भद्रा मारुती मंदिर संस्थानचे अध्यक्ष मिठू बारगळ, पोलिस ठाण्याचे अंमलदार खटके, तालुका समादेशक अधिकारी दगडू भेंडे, लिपिक गजानन गिरनारे उपस्थित होते. पलटन नायक बाबूभाई पठाण, राजू फुलारे, नईम शेख, भिकन अल्हाड, शाफीयुद्दिन मुजावर, इस्माईल पटेल, शालू विधाटे, सरुबाई भालेराव यांचाही सहभाग होता. या उपक्रमामुळे परिसर स्वच्छ व सुंदर झाला. उपस्थित मान्यवरांनी गृहरक्षक दलाच्या कार्याची प्रशंसा केली. कायदा व सुव्यवस्थेबरोबरच समाजसेवा, शिस्त आणि पर्यावरण रक्षणासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल समाधान व्यक्त केले. गृहरक्षक दल केवळ सुरक्षा व्यवस्थेपुरते मर्यादित नसून सामाजिक जबाबदारीतही सक्रिय असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/७२०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ९/१२/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) अमर इद्रिस बाशन २) शेख अन्वर शेख मुसा सर्व्हे नं.-१२ प्लॉट नं. २८ सिटी सर्व्हे नं. १८६७/क/२८ नं.प.मि.नं.१८-१४१-२८/१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१४१-२८/१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- सर्व्हे नं. १२ मधील जागा
पश्चिम : ६ मिटर रुंदीचा
कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- प्लॉट नं. २९
उत्तरः याच प्लाट मधील भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६७४
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १२/११/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) प्रकाश शिवाजी तारक सर्व्हे नं.-१ सिटी सर्व्हे नं. ५२५९ प्लॉट नं. १३, प्लॉट नं. १४ व प्लॉट नं. १५ रो हाउस प्लॉट नंबर १२ नं.प.मि.नं.१८-१३८-१२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१३८-१२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- याच सर्व्हे नं. मधील जमीन
पश्चिम : ६ मिटर रुंदीचा
कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- ६ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तरः प्लॉट नं. १२ मधील रोहाउस क्रमांक २

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/७०६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ८/१२/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) संजय अंबादास शिंदे २) सुरेश अंबादास शिंदे सर्व्हे नं.-८० प्लॉट नं. २ नं.प.मि.नं.१८-१०३-२/९ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१०३-२/९) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- याच सर्व्हे नं. मधील भाग
पश्चिम : सुनिल सोपान
जाधव यांचा प्लॉट
दक्षिण- याच सर्व्हे नं. मधील भाग
उत्तरः २० फुट रंदीचा रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# बेवारस प्रेताला पोलीस प्रशासनाचा खांदा

## चकलांबा पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जोपासत केला अंत्यविधी

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील तिंतरवणीच्या तलावामध्ये आढळलेल्या बेवारस प्रेताचा चकलंबा पोलिसांनी विधिवत अंत्यविधी करून सामाजिक बांधिलकी जोपासत आपले कर्तव्य बजावले आहे. यामुळे खाकीतील माणुसकीचे दर्शन समाजाला या निमित्ताने निश्चितच पाहायला मिळाले आहे.

शिरूर कासार तालुक्यातील मौजे तिंतरवणी या गावच्या तलावामध्ये गणेश जाधव या व्यक्तीला रविवार दि. ५:३० वाजण्याच्या सुमारास पाण्यावरती तरंगताना प्रेत दिसले होते. सदरील प्रेत कोणाचे याबद्दल तर्क वितर्क लावले जात होते. प्रेताची ओळख पटत नव्हती. येथील पोलीस पाटलांचे चिरंजीव राजेश महादेव नागरगोजे या तरुणांने चकलांबा पोलीस स्टेशनचे





सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्याशी फोन द्वारे संपर्क करून या बेवारस प्रेताची माहिती दिली. सदरील घटनेची माहिती मिळताच घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सपोनि. संदीप पाटील आपल्या फौज फाट्यासह घटनास्थळाकडे घेतली आणि पाण्यावरती तरंगणाऱ्या त्या प्रेताला पोलीस आणि गावकऱ्यांच्या मदतीने तलावाच्या बाहेर प्रयत्न सुरु केले. रात्रीच्या अंधारामुळे काम करताना मोठा अडथळा निर्माण होत होता. अखेर रविवारी रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांना मृतदेह बाहेर काढण्यास यश आले. मृतदेह कुजलेला असलेल्यामुळे त्याची मोठी दुर्गंधी येऊ लागली होती. आसपासच्या लोकांना यासंबंधी माहिती जाहीर करून या प्रेताची ओळख पटवण्यासाठी प्रयत्नही करण्यात आले मात्र या बेवारस प्रेताबद्दल कोणाचीच ओळख पटली नाही. अखेर चकलांबा पोलिसांना हे प्रेत शवविच्छेदनासाठी शिरूरकडे पाठवावे लागले. रात्रीची वेळ असल्यामुळे रविवारी रात्री या प्रेताचे शवविच्छेदनही झाले नाही. सोमवारी सकाळी पोलीस प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत या बेवारस प्रेताचे शवविच्छेदन करण्यात आले. सोमवार दुपारपर्यंत ही या बेवारस प्रेताला कोणीच ओळखू न शकल्याने पोलीस प्रशासनाला या बेवारस प्रेताचा अंत्यविधी करणे अनिवार्य झालं. या प्रेताचा दुर्गंधी ही मोठ्या प्रमाणात येऊ लागली होती. अशा या कुजलेल्या अवस्थेतील बेवारस प्रेताला कर्तबगारीचा खांदा द्यायची जबाबदारी पोलीस प्रशासनाने आपल्या खांद्यावरती घेतली. आणि सोमवारी दुपारी ३:३० वाजण्याच्या दरम्यान तिंतरवणी येथील सामुदायिक स्मशानभूमीमध्ये या बेवारस प्रेताला पांढऱ्या कपड्याची बोळवण करून लाकडाच्या सरणावरती ठेवण्यात आले. फुले, गुलाल या प्रेताला वाहून अगरबत्तीच्या सुवासाने दुर्गंधी हिन करण्यात आले. दस्तूर खुद्द सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी या प्रेताला अखेरचे पाणीही पाजले. आणि या प्रेताचा मुखाग्नी देऊन विधीवत अंत्यविधी करण्यात आला आहे. बेवारस प्रेताला पोलीस प्रशासनाने आपल्या जबाबदारीचा खांदा देऊन सामाजिक बांधिलकी जोपासत बेवारस प्रेताची विधिवत अंत्यविधी केल्याने समाजापुढे पोलीस खाकीत माणुसकीचे मोठे दर्शन झाले आहे. या कामी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्यासह पोलीस हवालदार राम बारगजे, गणेश केदार,बाबासाहेब मिसाळ पोलीस अंमलदार किरण मिसाळ आदी पोलीस कर्मचाऱ्यांनी मोठी मेहनत घेतली आहे. तर यांच्या मदतीसाठी तिंतरवणी येथील राजेश नागरगोजे, सुशील कोळेकर, अमोल अंकुश, आकाश सानप, परमेश्वर खेडकर या तरुणांचेही मोठे सहकार्य लाभले आहे.

### बेवारस प्रेताचे आम्ही वारस, आम्ही आमचं कर्तव्य समजलं

बेवारस प्रेताचा अंत्यविधी करताना चकलांबा पोलिसांनी विधिवत साहित्याचा वापर करून मुखाग्नी दिला. हे कार्य करताना आमच्या कर्तबदारीसोबत सामाजिक बांधिलकी जोपासत आम्ही बेवारस प्रेताचे आम्ही वारस होणं आम्ही आमचं कर्तव्य समजलं या प्रेताचा विधिवत अंत्यविधी केला यामुळे आम्हाला वेगळं समाधान लाभलं आणि हे कार्य करताना मनस्वी आनंदही झाला.

संदीप पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक चकलंबा

# आचारसंहितेच्या काळात जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे ३० लाखांचे ई-टेंडर

बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यानंतर लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेचा उघड उल्लंघनाचा गंभीर प्रकार समोर आला आहे. जिल्हा परिषद, बीड येथील बांधकाम विभागाने निवडणूक आचारसंहिता लागू असतानाच महा-ई-टेंडर प्रणालीवर थेट निविदा प्रसिद्ध करून राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांना हरताळ फासल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पुराव्यानिशी वंचितचे अजय सरवदे तक्रार दाखल करत तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

### सीईओ जितिन रेहमान कारवाई करतील की पडदा टाकतील?

तक्रारीनुसार, दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने ‘‘ .. ’’ या कामासाठी सुमारे ₹३० लाखांची निविदा प्रसिद्ध केली. ही निविदा १७ डिसेंबर २०२५ रोजी बंद होणार असून १८ डिसेंबर २०२५ रोजी उघडण्याचे नियोजन आहे.

विशेष बाब म्हणजे, बीड नगर परिषद निवडणुकीसाठी बीड शहराच्या हद्दीत दिनांक २१ डिसेंबर २०२५ पर्यंत आदर्श आचारसंहिता लागू आहे. जिल्हा परिषद कार्यालय हे थेट बीड शहराच्या हद्दीत येत असतानाही संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करून निविदा प्रक्रिया राबविल्याचा पुरावा तक्रारीसोबत देण्यात आला आहे.

या कृत्यामुळे निवडणुकीदरम्यान शासकीय यंत्रणेचा गैरवापर होत असून, निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेच्या पवित्रतेवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हे कृत्य राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांचे तसेच भारतीय संविधानातील निष्पक्ष निवडणूक तत्त्वांचे सरळ उल्लंघन असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष ◀◀ पान ३ वर

# पतंगासाठी नायलॉन मांजा विक्री कराल तर खाल जेलची हवा, दिंद्रुड पोलिसांचे निर्देश

दिंद्रुड । प्रतिनिधी

पतंगासाठी नायलॉन मांजा ची विक्री किंवा वापर कराल तर थेट जेलची हवा खाल असे निर्देश विक्रेत्यांना दिंद्रुड पोलिसांनी दिले आहेत. येत्या मकर संक्रांतीच्या औचित्याने पतंग विक्री करणाऱ्या दुकानांवर रविवारी दिंद्रुड पोलिसांनी छापे मारत नायलॉन मांजाची विक्री होत आहे का यासाठी पडताळणी केली.

मकर संक्रांतीला पतंग उडवण्याचा छंद जनमानसात प्रचलित आहे, पतंग उडवताना पतंगासाठी नायलॉन मांजा हा जीवितास घातक असलेला दोरा वापरल्याने अनेक अपघात होऊन जीवितास धोका निर्माण होण्याच्या घटना घडल्या आहेत. दुचाकीस्वार, पक्षी, लहान मुले नायलॉन मांजामुळे गंभीर जखमी झाले आहेत. याच अनुषंगाने दिंद्रुड पोलिसांनी रविवारी दिंद्रुड पोलीस हद्दीतील दिंद्रुड तेलगाव नित्रुड सह इतर गावांना भेटी देत जनरल स्टोअर्स, किराणा दुकानदार यांना पतंग विक्री करताना कुठला दोरा विक्री करतात याची पडताळणी केली. या छापेमारीत पोलीस हद्दीत कुठेही नायलॉन मांजा विक्री होत नसल्याचे दिंद्रुड पोलिसांच्या निदर्शनास आले. सर्व विक्रेत्यांना भविष्यात पतंगासाठी वापरण्यात येणारा दोरा कुणाच्याही जीवितास धोका निर्माण होणार नाही यासाठी काळजी घेण्याचे आवाहन सपोनि महादेव ढाकणे यांनी ◀◀ पान ३ वर



# भाऊ-बाबा पुण्यतिथीनिमित्त २१ ते २५ डिसेंबर दरम्यान पंचदिनी कीर्तन महोत्सव

आष्टी । प्रतिनिधी

शहरातील बेलगाव रोड लगत असलेल्या संत वामनभाऊ महाराज आणि संत भगवानबाबा प्रतिष्ठान येथे दि.२१ ते २५ डिसेंबर २०२५ या कालावधीत पंचदिनी कीर्तन महोत्सव,अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला आहे.याचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.संत वामनभाऊ,संत भगवानबाबा प्रतिष्ठान यांच्यावतीने आष्टी शहरात पंचदिनी कीर्तन महोत्सव व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा होत आहे.अस्थिर



काळामध्ये वैराग्यमूर्ती संत वामनभाऊ,संत भगवानबाबा आणि विश्ववंदनीय साधुसंताच्या कृपाशीर्वादाने या पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केलेले आहे.भाविकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपले जीवन कृतार्थ करावे असे आवाहन करीत राष्ट्रसंत वामनभाऊ आणि राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त साधुसंतांच्या कृपाशीर्वादाने रविवार दि.२१ ते गुरुवार दि.२५ डिसेंबर २०२५ पर्यंत पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. पहाटे काकड आरती,विष्णु

सहस्त्रनाम,प्रार्थना,ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण,हरिपाठ , भोजन,हरिकीर्तन आणि हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम आहेत. ◀◀ पान ३ वर

# पाटोदा-मांजरसुंबा हायवेची दयनीय अवस्था; अपघातांना निमंत्रण

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा ते मांजरसुंबा दरम्यानचा एम.एच. ५४८ हा राज्य महामार्ग सध्या अत्यंत खराब अवस्थेत असून नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. सिमेंट रस्ता अनेक ठिकाणी फाटलेला असून रस्त्याची गुणवत्ता अतिशय निकृष्ट असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

रस्त्यावर आवश्यक असलेले साईड पट्टे (साईड लाईन) तसेच मधले पांढरे पट्टे पूर्णपणे गायब आहेत. यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नसून अपघातांची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रत्यक्षात या मार्गावर अपघात घडल्याच्या घटनाही घडत आहेत.

याशिवाय रस्त्याच्या मधोमध असलेले डीपीचे लाईट पोल योग्य प्रकारे बसवलेले नसून, काही ठिकाणी ते धोकादायक स्थितीत आहेत. रस्त्याच्या बाजूला आवश्यक असलेली रेडियम लावलेली दिशादर्शक चिन्हे, वळणांची सूचना देणारी चिन्हे तसेच रिफ्लेक्टर प्लेट्स अनेक ठिकाणी नसून काही ठिकाणी त्या तुटलेल्या अवस्थेत आहेत.गंभीर बाब म्हणजे, ◀◀ पान ३ वर

# पाटोदा शहरातील अंगणवाड्यांची अवस्था बिकट भाड्याच्या खोल्यांत कोंडले जाताहेत चिमुकले

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील अंगणवाड्यांची अवस्था अत्यंत दयनीय बनली असून जागेअभावी अनेक अंगणवाड्या भाड्याच्या खोल्यांमध्ये भरवाव्या लागत आहेत. या खोल्यांमध्ये पुरेशी जागा नसल्याने लहान लेकरांना थेट जमिनीवर बसवावे लागत असून काही ठिकाणी अंगणवाडी बाहेरच्या पटांगणात भरवली जात असल्याचे चित्र आहे.

अंगणवाड्यांमध्ये आवश्यक असलेली स्वच्छता, सुरक्षितता व बालकांसाठी अनुकूल वातावरण याचा पूर्णपणे अभाव दिसून येतो.



बोर्डांवरही स्वच्छतेचा अभाव असून परिसर अस्वच्छ अवस्थेत आहे. पावसाळा असो वा उन्हाळा, चिमुकल्यांच्या आरोग्याचा विचार न करता अंगणवाड्या कशाबशा सुरू आहेत.

या गंभीर समस्येकडे नगरपंचायत आणि संबंधित नगरसेवक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. काही नगरसेवक गुत्तेदारी व इतर स्वार्थी प्रश्नांत अडकले असून जनतेच्या विकासाकडे त्यांचे लक्ष नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया पालक व नागरिक व्यक्त करत आहेत.

निवडणुकीच्या वेळी जनतेचे पाय धरून मते मागणारे लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर मात्र ◀◀ पान ३ वर

# आष्टी-शिरूरमधील दोन कर्मचारी निलंबित कारवाईच्या मागे राजकीय हस्तक्षेपाची चर्चा

बीड । प्रतिनिधी

चौकशीसाठी अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत आणि चौकशीला सहकार्य केले नाही, या कारणावरून जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागातील दोन ग्रामपंचायत अधिकाऱ्याला तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. आष्टी तालुक्यातील किन्ही येथील ए. ए. सानप आणि शिरूर (कासार) तालुक्यात घाटशीळ पारगाव येथे कार्यरत असलेले पी.के. सानप हे निलंबित झालेले ग्रामपंचायत अधिकारी आहेत. जिल्हा परिषदेच्या या तडकाफडकी निलंबित निर्णयामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

यासंदर्भात माहिती अशी की, शिरूर कासार तालुक्यातील घोगस पारगाव येथील ग्राम पंचायत अधिकारी पिके मिसाळ यांनी चौकशीसाठी सहकार्य केले नाही बदली होऊनही पदभार दिला नाही या कारणावरून त्यांची चौकशी करण्यात आली. मात्र चौकशीला सहकार्य केले नाही या कारणावरून त्यांचा निलंबनाचा प्रस्ताव तयार करण्यात आला. तसेच आष्टी तालुक्यातील किनी येथे करत असलेले ग्राम पंचायत अधिकारी सानप यांच्याविरुद्ध सुरज विक्रम काकडे यांनी तक्रार केली होती यामध्ये ग्रामपंचायतीचा कर वसूल केला नाही आणि नमुन्या नंबर नुसार माहिती ठेवली नाही. यामुळे सानप यांची चौकशीसाठी आदेश देण्यात आले होते. चौकशीत सहकार्य केले नाही या कारणावरून सानप यांनाही निलंबित करण्यात आले. एकाच वेळी दोघा ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्यामुळे खळबळ उडाली असून यासंदर्भात उलटसुलट उलट सुलट चर्चा होत आहे. मिसाळ आणि सानप यांचे निलंबन राजकीय दबावातून करण्यात आल्याची चर्चा होत आहे.

# महात्मा फुले युवा दलाचा ‘फुले दांम्पत्य जीवन गौरव पुरस्कार’ बारगजे दांम्पत्याला प्रदान

बीड । प्रतिनिधी

सामाजिक न्याय व बंधुतेच्या मूल्यांवर आधारित कार्य करणाऱ्या दांपत्यांचा सन्मान करण्याची परंपरा महात्मा फुले युवा दलाने सुरू केली असून, या उपक्रमांतर्गत पहिला राज्यस्तरीय ‘फुले दांपत्य जीवन गौरव पुरस्कार’ इन्फंट इंडिया संस्थेचे संचालक श्री. दत्ता बारगजे व सौ. संध्या बारगजे या दांपत्यास त्यांच्या अतुलनीय सामाजिक कार्याबद्दल प्रदान करण्यात आला.

दि. १५ डिसेंबर रोजी बीडजवळील आनंदग्राम, पाली येथे जाऊन अत्यंत सन्मानाने हा पुरस्कार



प्रदान करण्यात आला. बारगजे दांपत्याची सन २०२४२५ या वर्षासाठी या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. यावेळी सन्मानचिन्ह, फुले पगडी, साडी-चोळी व ₹११,०००/- रोख रक्कम देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सतीश शिंदे म्हणाले की, दत्ता बारगजे व संध्या बारगजे हे अत्यंत समर्पित भावनेने आनंदग्राममध्ये एचआयव्ही बाधित पालकांच्या मुला-मुलींचे शिक्षण व संगोपन करत आहेत. समाजाकडून दुर्लक्षित व तिरस्कारास पात्र ठरलेल्या या मुलांच्या स्वाभिमान व स्वावलंबनासाठी बारगजे दांपत्य त्यागी वृत्तीने कार्य करत आहे.

सत्काराला उत्तर देताना दत्ताभाऊ बारगजे म्हणाले की, ‘‘बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून आम्ही या कार्याची सुरुवात केली. समाजाच्या तळागाळातील घटकांसाठी काम करण्याचे मोठे आव्हान स्वीकारले आहे. आनंदग्राम उभे राहताना समाजाचा व अनेक दानशूर ◀◀ पान ३ वर

# ॲड.मंगेश ससाणे यांच्यावर हल्ला करणाऱ्या समाज कंटकांना अटक करा-सकल ओबीसी समाज



माजलगाव । प्रतिनिधी

ॲड. मंगेश ससाणे यांचेवर प्राणघातक हल्ला करणा-या समाज कंटकांना अटक करून कारवाई करावी अशी मागणी सकल ओबीसी समाज माजलगावच्या वतीने शहर पोलिस प्रशानामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ॲड. मंगेश ससाण पवन करवर यांच्यावर दोन महिण्यांपूर्वी झालेल्या हल्याची कारवाईस दिरंगाई होत असल्याने चौकशीसाठी माजलगाव ग्रामीण पोलिस स्टेशन येथे भेटून माजलगाव मार्गे धारूर ला जात असतांना धारूर घाटामध्ये काही समाजकंटकांनी त्यांच्यावर दगडफेक करत प्राणघातक हल्ला केला. त्यामुळे या प्रकरणातील आरोपींवर कारवाई करण्यात यावी अन्यथा त्यांचा निषेध म्हणून सकल ओबीसी समाज माजलगावच्या वतीने तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# चिंचवण रोडवरील ‘सिमेंट’ रस्त्याला पडल्या भेगा !

## काही दिवसापूर्वीच रस्ता झाला; मग दोषी कोण? बांधकाम विभाग की गुत्तेदार

वडवणी । प्रतिनिधी

पाडळसिंगी लातूरकडे जाणारा महामार्ग वडवणी शहरातून जात आहे. सध्या या मार्गाचे नवीन रस्ता व नाली बांधकामाचे काम युद्ध पातळीवर सुरू असल्याचे दिसून येत आहे. तर वडवणी शहरांमधून जाणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौका पासून ते पुढे चिंचवणकडे जार्णाय़ा रस्त्याचे काम काही दिवसापूर्वीच नाविन्यपूर्ण केले आहे. तर या रस्त्यावर चक्क दृश्य भेंगा पडल्याचे दिसून येत आहे. असे असेल तर मग दोष कोणाचा ? रस्ता



की बांधकाम विभाग अथवा गुत्तेदाराचा हेच समजायला मार्ग नाही.येत्या काही दिवसात तेलगाव ते माजलगाव रोडवर पडलेल्या भेगा सारखी परिस्थिती होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे जनते मधून बोलले जात आहे.

वडवणी शहरातील माता अहिल्याबाई होळकर चौक ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकापर्यंत रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. तर एका साईटने नालीचे काम पूर्ण झाले आहे. यानंतर वडवणी शहराचे प्रवेशद्वार असणारे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चिंचवण रोड इंथ पर्यंत सिमेंट रस्त्याचे काम पूर्णत्वापणे झाले असल्याचे दिसून येत आहे. तर प्रवेशद्वार ते नाईक चौकापर्यंत दोन्ही साईटने नालीचे काम देखील पूर्ण झाले आहे. शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून ते चिंचवणकडे जाणाऱ्या शहरातील रस्त्याचे काम देखील पूर्ण झाले आहे. या रस्त्यावर मध्यभागी पांढऱ्या कलरचे दर्शनी व रोडच्या साईटने पिवळ्या कलरची दर्शनी भागाला देखील ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार दि.१६ डिसेंबर २०२५ । पान ७

# पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप-राष्ट्रवादी समोरासमोर

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात महानगर पालिका निवडणुकांचा बिगुल वाजताच सत्तासमीकरणं वेगाने घडू लागली आहे. पुण्यात महायुती होणार नसल्याचे खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. पुण्यात व पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) हे समोरासमोर असेल, आमच्या एकत्रित आल्याने विरोधकांचा फायदा होऊ नये म्हणून आम्ही मैत्रिपूर्ण निवडणूक लढवणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात विविध विकास कामांच्या उद्घाटणानंतर मध्यमांशी बोलतांना स्पष्ट केले.

पुण्यात तब्बल ३ हजार कोटींच्या विकास कामांचे उद्घाटन व भूमिपूजन सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गणेश कला क्रीडा मंच येथे ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. या कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यात कुठे कुठे महायुती आणि कुठे स्वतंत्र लढणार याची माहिती दिली.फडणवीस म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका निवडणुकांच्या तारखा घोषित केल्याबद्दल मला खूप आनंद आहे. आम्ही या निर्णयाचे स्वागत करतो.



## आरक्षणाच्या मुद्यावर कोर्ट निर्णय देईल तो अंतिम

**आरक्षणाच्या प्रश्नांवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नागपूर आणि चंद्रपूर महापालिकेत आरक्षण हे ५० टक्यांच्या वर गेले आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की यांच्या निवडणुका घ्या, पण तो आमच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील, आम्ही जो निर्णय देऊ तो त्यांना बंधनकारक राहील.**

कारण राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे कारभार प्रशासकाच्या मार्फत चालवणे हे लोकशाहीला अभिप्रेत नव्हते. न्यायालयाच्या निर्णयामुळे दीर्घकाळ या संस्था निर्वाचित प्रतिनिधींच्या विना होत्या. आता पुन्हा या निवडणुका होत आहेत. आम्हाला विश्वास आहे की आमच्या शासनाने केलेले काम पाहता पुन्हा लोक आमच्याच बाजूने कौल देतील, जनता आम्हाला पुन्हा शहर विकासाची संधी देतील. फडणवीस म्हणाले, आम्ही महायुती करण्याचा प्रयत्न करत आहोत. जास्तीत जास्त ठिकाणी भाजप आणि शिवसेनेची युती होईल. काही ठिकाणी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसची युती होईल. तर काही ठिकाणी भाजप राष्ट्रवादी काँग्रेसची युती देखील पाहायला मिळेल. मात्र, पुण्यात व पिंपरीचिंचवड मध्ये आम्ही स्वतंत्र लढणार आहोत. या बाबत अजित पवार यांच्याशी माझी चर्चा झाली आहे. पुण्यामध्ये आम्ही दोन्ही मोठे पक्ष आहोत. भाजपने गेल्या पाच वर्षात पुण्याचा चांगला विकास केला आहे. त्यामुळे पुण्यात महायुती होणार नाही. मैत्रीपूर्ण लढत होतांना दोघांमध्ये कटुता येणार नाही, असे देखील फडणवीस यांनी स्पष्ट केले. मराठी पंतप्रधान या संदर्भात प्रश्नला उत्तर देतांना फडणवीस म्हणाले, आता पर्यंत वेगवेगळ्या नेत्यांना स्वप्न पडत होती, त्यांना साक्षात्कार होत होते हे आम्ही पहिले आहे. पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारखा जेष्ठ नेता जे राज्याचे मुख्यमंत्री राहिले आहेत, पंतप्रधान कार्यालयाचे मंत्री राहिले आहेत, त्यांना अशाप्रकारे साक्षतात्कार व्हायला लागले तर मात्र त्याच्यात काही तरी काळे बेरे आहे. पृथ्वीराज चव्हाण हे चांगले नेते आहेत. त्यांचे आरोग्य चांगले राहावे अशी शुभेच्छा त्यांना आहे. आशा प्रकारे विचार करून त्यांनी त्रास करून घेऊ नये असे फडणवीस म्हणाले.

# भोर, राजगड आणि मुळशीतील जलजीवन मिशनच्या कामांवर चौकशी; मंत्री गुलाबराव पाटील यांचे आदेश!



**पुणे । प्रतिनिधी**

भोर,राजगड आणि मुळशी या तालुक्यात जलजीवन मिशनच्या मोठ्या प्रमाणात अनियमितता , अर्धवट कामे आणि कामे पूर्ण होण्याआधीच ठेकेदारांची बिले अदा करण्याचे प्रकार घडले आहेत. यासर्व पार्श्वभूमीवर आमदार शंकर मांडेकर यांनी राज्याचे पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांची भेट घेत दोषी असणाऱ्या अधिकारी आणि ठेकेदारांची चौकशी करण्याची मागणी केली होती. याची गंभीर दखल घेत मंत्री पाटील यांनी यासर्व प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश महराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सचिवांना दिले आहेत.

भोर,राजगड -मुळशीचे आमदार शंकर मांडेकर यांनी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला होता. तसेच यासंदर्भात नुकतीच राज्याचे पाणीपुरवठामंत्री गुलाबराव पाटील यांची भेट घेत त्यांना यासंदर्भात निवेदन दिले. यामध्ये जलजीवन मिशनमधील सर्व कामांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. याची तातडीने दखल घेत पाणीपुरवठामंत्री पाटील यांनी या तीनही तालुक्यातील जलजीवनच्या कामाची चौकशीचे आदेश दिले आहेत.

यावेळी आमदार मांडेकर यांनी सांगितले की, नागरिकांना पाणी मिळणे हा मूलभूत हक्क असून या योजनांतील त्रुटी तातडीने दूर होणे आवश्यक आहे, यासाठी पाणीपुरवठा मंत्री पाटील यांची भेट घेतली. यावेळी जलजीवन मधील अर्धवट कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश संबधित यंत्रणांना देण्यात यावेत. निकृष्ट कामे आणि अनियमित कामांवर संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. जादा देयके दिली असल्यास ती तात्काळ वसूल करून दोषी असणार्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच कामे पूर्ण झालेल्या पाणी पुरवठा योजनांच्या कामांची दक्षता व गुण नियंत्रण मंडळ मार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. जलजीवनच्या अपूर्ण कामासंदर्भात सातत्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडेही पाठपुरावा करण्यात आला. याविषयी जल जीवन मिशन योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या गावनिहाय पाणी पुरवठा योजनांचा आढावा गटविकास अधिकारी, संबंधित पाणी पुरवठा अधिकारी, संबंधित गावचे सरपंच व उपसरपंच तसेच ग्रामसेवक, ठेकेदार यांच्या उपस्थितीत बैठक घेणार असल्याचे आमदार मांडेकर यांनी सांगितले.



अलंकापुरीत सफला एकादशी दिनी इंद्रायणी आरती भाविकांची गर्दी
इंद्रायणी काठावर आरती कोनशिलेचे लोकार्पण ; मंदिरात पुष्प सजावट

# पुण्यात पुस्तकांचा पूर! कोट्यवधींची उलाढाल आणि तरूणाईची झुंबड

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या पुणे पुस्तक महोत्सवाला नागरिकांनी पहिल्या दोन दिवसांतच उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. या दोन दिवसांत तब्बल दीड लाखांपेक्षा अधिक पुस्तकप्रेमींनी महोत्सवाला भेट देऊन पुस्तक खरेदीचा मनमुराद आनंद लुटला.परिणामी काही कोटींची उलाढाल झाल्याची माहिती महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी दिली.महोत्सवाचे शनिवारी उद्घाटन झाल्यानंतर पहिल्याच दिवशी सुमारे ७० हजारांहून अधिक नागरिकांनी गर्दी केली. या विक्रमी गर्दीत युवक-युवतींचा सहभाग



लक्षणीय होता. अनेक नागरिकांनी केवळ एक पुस्तक न घेता, एकापेक्षा अधिक पुस्तकांची खरेदी करण्याकडे कल दर्शविला.

मराठी, हिंदी, इंग्रजीसह विविध विषयांवरील पुस्तकांच्या दालनांमध्ये खरेदीसाठी मोठी गर्दी होती, ज्यात परदेशी नागरिकांचाही सहभाग दिसून आला.पुणे मध्यभागी असल्याने, पश्चिम महाराष्ट्रातील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये आणि ग्रंथालये मोठ्या संख्येने येथे भेट देत आहेत. या आस्थापनांना दरवर्षी मोठ्या प्रमाणात पुस्तकांची खरेदी करावी लागते.सवलतीच्या दरात आणि एकाच ठिकाणी नवीन पुस्तके खरेदी करणे त्यांना परवडते. महोत्सवात नव्या पुस्तकांची आणि लेखकांची माहिती मिळण्यासोबतच साहित्यविश्वातील नवे ट्रेंड्स समजत असल्याने, तसेच लेखकांशी थेट संवाद साधता येत असल्याने ग्रंथपालांसाठी हा महोत्सव एक मोठी पर्वणी ठरत आहे. पुस्तकांच्या दालनांना भेटी देण्यासोबतच नागरिकांनी पाल्यांना 'चिल्ड्रेन कॉर्नर'ची सफर घडवली आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचाही आनंद लुटला. कोणत्या पुस्तकांची विक्री अधिक झाली, कोणत्या विषयांना पसंती मिळाली आणि एकूण उलाढाल याबाबत महोत्सवाच्या शेवटच्या टप्प्यात सविस्तर माहिती दिली जाईल, अशी माहिती राजेश पांडे यांनी दिली.

# 'एमबीबीएस'ला ॲडमिशन घेऊन देतो; असं बोलून केली सव्वा कोटींची फसवणूक; पुण्यातील दोघांविरुद्ध गुन्हा दाखल!

**पुणे । प्रतिनिधी**

जळगावच्या डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेज व रुग्णालयात 'एमबीबीएस' या वैद्यकीय पदवीला प्रवेश मिळवून देण्याच्या बहाण्याने पुण्यातील दोन भामट्यांनी चंद्रपूर येथील एका मुलीच्या पालकासह १३ जणांना तब्बल १ कोटी २६ लाख २८ हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी बाणेर पोलिस ठाण्यात राजेश गुप्ता आणि ब्रिजेश आर्या या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रवीण किशोर हलकरे (वय ५२, रा. रामनगर, चंद्रपूर) यांनी तक्रार दिली.

तक्रारदार यांचा सीसीटिव्ही विक्री, सेवा व्यवसाय आहे. त्यांना गेल्यावर्षी ता. १ नोव्हेंबर रोजी फेसबुकवर 'एमबीबीएस' ला प्रवेश दिला जाईल अशी जाहिरात




वाचली. मुलीला 'एमबीबीएस'साठी प्रवेश घ्यायचा असल्याने त्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर फोन केला. त्यावेळी राजेश गुप्ता याने त्यांना बाणेर येथील तेजस इटरनिटी, बालेवाडी फाटा येथील त्यांच्या कार्यालयात बोलावले. तेथे राजेश गुप्ता व त्याचा सहकारी ब्रिजेश आर्या यांनी तक्रारदाराला जळगावच्या डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेउन देतो असे आश्वासन देत डोनेशनसाठी ३५ लाख रुपये लागतील सांगत तीन लाख रुपये घेतले. तर उर्वरित प्रवेश शुल्क हप्त्यानुसार सुविधा करून देतो असे सांगितले. त्यांनी त्याबाबत कराराचे पत्रही त्यांना दिले. त्यानंतर त्यांनी जळगावला तक्रारदाराकडून सात लाख रुपये घेतले व जळगावच्या मेडिकल कॉलेजचा खोटा फॉर्म सोबत आणला. त्यावर आरोपींनी मुलीची सही घेतली व तिचा फोटो चिकटवला. परंतू, हा स्कॅम असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर गुन्हा दाखल केला. समाजमाध्यमावर शिक्षणासाठी प्रवेश द्यायची अशी जाहिरात करून लुटण्याचा हा नवा फंडा समोर येत आहे. याबाबत साहाय्यक निरीक्षक अनिल केकाण म्हणाले की, दोघा आरोपींनी १३ जणांची फसवणूक केली आहे. त्यांनी तीन महिन्यापूर्वी कार्यालय थाटले होते. आता ते ६ डिसेंबरपासून बंद आहे.

# शिवागाळ केल्याने मित्रांकडूनच मित्राची हत्या; भानावर येताच दोन्ही आरोपींचे आत्मसमर्पण

**बारामती । प्रतिनिधी**

दारूच्या नशेत असलेल्या दोन मित्रांनी तिसऱ्या मित्राचा निर्घृण खून केल्याची घटना मोरगाव रोड येथे घडली. नशेतून भानावर आल्यावर दोन्ही आरोपींनी थेट पोलीस स्टेशन गाठले. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

शहरातील जुन्या मोरगाव रोड येथे तीन मित्र दारू पीत बसले होते. किरकोळ कारणावरून त्यांच्यात शिवीगाळ झाली. त्यानंतर त्याचे रूपांतर भांडणात झाले. अविनाश उर्फ माऊली धनंजय लोंढे याने शिवागाळ केल्याने दोन्ही मित्रांनी त्याला जीवानिशी मारलं.

इतका वाढला की, संतप्त झालेल्या दोघांनी बाजूला असलेला एक दगड उचलला आणि त्यांनी तिसऱ्या मित्राच्या डोक्यात दगड घालून त्याला ठेचलं. त्यांचा मित्र मरेपर्यंत दोघांनी त्याला दगडाने मारहाण केली आणि त्याचा डोक्याचा चेंदामेंदा केला.

या घटनेनंतर भानावर आलेले दोन्ही आरोपी थेट पोलीस ठाण्यात हजर झाले आणि त्यांनी पोलिसांना घडलेला प्रकार सांगितला. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशीरा घडलेल्या या घटनेत अविनाश उर्फ माऊली धनंजय लोंढे (वय २०, बारामती) याचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी याप्रकरणी समीर इक्बाल शेख आणि प्रथमेश राजेंद्र दळवी या दोघांना ताब्यात घेतले आहे. दरम्यान, अविनाशचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच दोन्ही आरोपींनी स्वतःहून पोलीस ठाण्यात हजर होऊन आत्मसमर्पण केलं. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा केला. दोन मित्रांनी दारुच्या नशेत केलेली हे क्रूर कृत्य शहरात चर्चेचा विषय ठरलं आहे.

# दबा धरून बसलेल्या बिबट्याची ८ वर्षीय रोहितवर झडप; चिमुकल्याचा दुदैवी अंत

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याच्या जुन्नर आणि शिरूर तालुक्याच्या सरहद्दीवर असलेल्या पारगाव तर्फे आळे परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात एका ८ वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

मृत मुलाचे नाव रोहित काफरे (वय ८) असे आहे. रोहित हा शेतमजूर कुटुंबातील मुलगा असून, त्याचे आई-वडील शेतात कांदा लागवडीचे काम करत होते. याचवेळी रोहित शेतालगत खेळत असताना ऊसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्याच्यावर हल्ला केला. क्षणात घडलेल्या या घटनेत बिबट्याने रोहितला फरफटत नेऊन ठार केले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत रोहितचा मृत्यू झाला होता. या घटनेने काफरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, गेल्या तीन महिन्यांतील बिबट्याच्या हल्ल्यांमधील ही चौथी मृत्यूची घटना असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अजून किती निष्पाप बळी जाणार? असा सवाल संतप्त ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.



घटनेनंतर वनविभाग आणि पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. ग्रामस्थांनी वनविभागाकडे तात्काळ बिबट्याचा बंदोबस्त, पिंजरे लावणे, गस्त वाढवणे आणि परिसर सुरक्षित करण्याची जोरदार मागणी केली आहे. बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे जुन्नर तालुक्यातील ग्रामीण भागात नागरिकांचे जगणे असुरक्षित झाले असून, प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, मागील काही दिवसांपासून पुणे शहर आणि परिसरात बिबट्या आल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. यातल्या काही खोट्या तर काही चर्चा खरं आहेत. अशीच चर्चा खराडी परिसरातही रंगली. चक्क पोलिसांनाच फोन करून खराडी परिसरात बिबट्या दिसण्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी नागरिकांना आवाहन करताना बिबट्या दिसला तर आम्हाला कळवा असं म्हणत जनजागृतीही केली.

# स्थायी समिती सभेत विविध विकासकामांच्या खर्चास प्रशासक श्रावण हर्डीकर यांची मान्यता

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापालिका तसेच स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक श्रावण हर्डीकर दूरस्थ (ऑनलाईन)पद्धतीने उपस्थित होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त हर्डीकर यांनी मान्यता दिली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, विजयकुमार खोराटे, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.



स्थायी समिती सभेत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता तिसऱ्या व चौथ्या टप्प्यात नाट्य प्रशिक्षण उपक्रम राबविणे, इ क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्र. ५ गवळीनगर व इतर परिसरातील सेवा वाहिन्या टाकलेल्या ठिकाणचे रस्ते पेव्हिंग ब्लॉक टाकून सुधारणा करणे व अनुषंगिक कामे करणे, येथील रस्त्यांची एम. पी. एम. व हॉटमिक्स पद्धतीने दुरुस्ती करणे आणि इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासक हर्डीकर यांनी मान्यता दिली. तर प्रभाग क्र. ३ चऱ्होली, प्रभाग क्र. ४ बोपखेल, प्रभाग क्र. ५, प्रभाग क्र. ७ परिसरातील विविध ठिकाणची स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणे व प्रभागातील अनुषंगिक कामे करणे तसेच प्रभाग क्र. ५ मधील डांबरी रस्त्यांची हॉटमिक्स पद्धतीने दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत मामुर्डी सर्वे नं. ४ मधील आ. क्र. ४/१६४ खेळाचे मैदान येथे सीमाभिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ९ मधील महापालिकेच्या विविध कार्यक्रमांकरिता मंडप व्यवस्था करणे तसेच प्रभाग क्र. २ जाधववाडी येथील कचरा संकलन केंद्र व परिसरातील डांबरीकरण व प्रभाग क्र. २ मधील चिखली कुदळवाडी येथील परिसरात स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास आयुक्त हर्डीकर यांनी मान्यता दिली. तर महापालिकेच्या आरोग्य विभागासाठी डिओडरंट कम डिसइन्फेक्टंट खरेदी करणे, स्थायी समिती सभागृह येथे व्हिडीओ स्प्लिटर बसविणे या विषयांना देखील मान्यता देण्यात आली. याव्यतिरिक्त, इ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ५ मधील गणेश कॉलनी व इतर परिसरातील व प्रभाग क्र. ३ मोशी येथील विविध ठिकाणी स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास स्थायी समिती सभेत मान्यता देण्यात आली. याशिवाय, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. ४ दिघी परिसरात विविध ठिकाणी स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्ती विषयक कामे करणे, ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २ चिखली येथील रस्त्याचे एम. पी. एम. पद्धतीने डांबरीकरण करणे तसेच प्रभाग क्र. २ मोशीमधील परिसरात महापालिका इमारतींची कामे करण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच ब क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २२ काळेवाडी येथील विविध ठिकाणी स्टॉर्म वॉटर व इतर स्थापत्य विषयक कामे करणे, क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र. २ मोशी परिसरात एम. पी. एम. पद्धतीने रस्त्यांचे डांबरीकरण करणे व महापालिका शाळा, दवाखाना यांची देखभाल-दुरुस्तीची स्थापत्य विषयक कामे करणे यासह विविध विषयांना येणाऱ्या खर्चास आयुक्त हर्डीकर यांनी यावेळी मंजुरी दिली.

# काठापुर खुर्द परिसरातील बिबट्या अखेर जेरबंद; वनविभागाला यश

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील काठापुर खुर्द परिसरातील शेतकरी संतोष दशरथ वाव्हळ यांचे शेतात वनविभागाकडून लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात ७ वर्षीय मादी संवर्गातील बिबट्याला सोमवारी (दि. १५) रोजी पहाटे वनविभागाकडून जेरबंद करण्यात आले.

मागील दोन महिन्यापासून या भागात बिबट्याचे वास्तव्य नेहमीच स्थानिकांच्या निदर्शनास येत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काठापुर खुर्द येथे सरपंच सिमा थिटे आणि विकास सोसायटीचे अध्यक्ष अशोक दाते यांनी वारंवार या भागात पिंजरे लावून बिबट्याना जेरबंद करण्याची मागणी केली होती.

पिंपरखेड येथील बिबट हल्ल्यात दोन चिमुरड्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर अलर्ट झालेल्या वनविभागाकडून मागील घटनांचे गांभीर्य लक्षात घेता या परिसरात पिंजरे लावण्यात आले होते.

गेली अनेक दिवसांपासून बिबट्याच्या भीतीने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आलेला होता तसेच नागरिक, शेतमजूर हे भीतीच्या सावटाखाली जीवन जगत असुन अद्यापही या भागातून बिबट्याची संख्या कमी झाली नसल्याचे दिसून येत आहे. मात्र वनविभागाने बेट भागातील पिंपरखेड, जांबुत, फाकटे, काठापूर खुर्द आणि परिसरात पिंजरे लावून वास्तव्य करणारे बिबटे जेरबंद करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शंकर उर्फ नितिन पिंगळे यांनी केली आहे.